७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २८ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# महाराष्ट्रात पुढील ४८ तास महत्त्वाचे

## पुणे, कोकणसह अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट, शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना

**मुंबई (दै. संध्या)**

दोन दिवस विश्रांती घेतल्यानंतर राज्यात मान्सून पुन्हा एकदा रौद्र रूप धारण करणार आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे आणि पुण्यासहित राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. शनिवार आणि रविवारी (२७ व २८ जून) कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर सर्वाधिक असेल, असा अंदाज वर्तवून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



गेल्या दोन दिवसांपासून मुंबई आणि पुण्यात पावसाने काहीशी विश्रांती घेतली असून ढगाळ वातावरणामुळे तापमानात वाढ नोंदवण्यात आली होती. मात्र, रविवारपासून मान्सून पुन्हा सक्रिय होणार असून पुण्यासह रायगड, रत्नागिरी आणि अहिल्यानगरमध्ये जोरदार पाऊस हजेरी लावेल. तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पावसाची दाट शक्यता आहे. मान्सून स्थिरावत असतानाच पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी परिसरात ढगफुटीसदृश पावसाने मोठे संकट आणले आहे. या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याखाली गेली असून, खरीप हंगामासाठी तयार केलेली शेती अक्षरशः वाहून गेली आहे. पावसाअभावी चिंतेत असलेल्या बळीराजावर आता या अतिवृष्टीने दुहेरी संकट ओढवले असून, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, रायगड, रत्नागिरी, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली.

जिल्ह्यात मान्सून लांबल्याचा सर्वाधिक फटका यंदाच्या खरीप हंगामाला बसला आहे. जूनचे २६ दिवस उलटूनही जिल्ह्यात केवळ ४१.८ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याने खरीपाच्या पेरण्यांना अक्षरशः ब्रेक लागला आहे. जिल्ह्यातील ६ लाख ७४ हजार ४६१ हेक्टर पेरणीयोग्य क्षेत्रापैकी आतापर्यंत केवळ १९ हजार ४६८.९२ हेक्टरवर म्हणजेच अवघ्या २.८९ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. गेल्या ११ वर्षांतील हा जूनच्या २६ दिवसांतील सर्वात कमी पाऊस ठरला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात साधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून सक्रिय होतो.

यंदा मात्र पहिला समाधानकारक मान्सूनचा पाऊस २२ जूनला झाला. त्यानंतरही सर्वदूर पाऊस न झाल्याने जमिनीत आवश्यक ओल निर्माण झाली नाही. परिणामी बहुतांश शेतकऱ्यांनी पेरण्या थांबवून दमदार पावसाची प्रतीक्षा सुरू ठेवली आहे.

गेल्या वर्षी परिस्थिती याच्या नेमकी उलट होती. मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाली होती. त्यामुळे २६ जूनअखेर सुमारे तीन लाख हेक्टरवर खरीपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. यंदा मात्र पावसाने हुलकावणी दिल्याने हा वेग पूर्णपणे मंदावला आहे.

## TET चा पेपर फुटला, आज होणारी परीक्षा रद्द

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पुन्हा एकदा पेपरफुटीच्या वादात अडकली आहे. ठाणे जिल्ह्यात उद्या होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर मोठी कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर उद्या होणारी परीक्षा स्थगित करण्यात आल्याची माहिती समोर आली असून, शिक्षण विभागाकडून याबाबत अधिकृत आदेश जाहीर होण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्ह्यातून पेपरफुटी झाल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणी पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले आहे. त्यामुळे देशभरात नीट (NEET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणानंतर आता आणखी एका महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. TET पेपर फुटीप्रकरणी पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. शिक्षक पात्रता परीक्षा (TET) चा पेपर लीक करणाऱ्या टोळीविरुद्ध भिवंडीत कारवाई झाली. कोनगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीत लावलेल्या सापळ्यात 3



■ भिवंडीत प्रश्नपत्रिका विकणारे ३ जण ताब्यात

■ परीक्षा परिषदेचा निर्णय- फेरपरीक्षेसाठी पुन्हा शुल्क नाही

जणांना ताब्यात घेण्यात आले. कोनगावच्या डायमंड हॉटेलमध्ये पेपरफुटी संदर्भात संशयित असल्याच्या गुप्त माहितीनंतर कोनगाव पोलिसांचे पथक हॉटेलमध्ये दाखल झाले. मात्र, हे संशयित त्या ठिकाणी आढळले नाहीत. त्यानंतर, पोलिसांच्या पथकाने सहारा एअरपोर्ट परिसरातून तिघांना ताब्यात घेतले. पोलिसांच्या प्राथमिक तपासातच ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींकडून TET परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न आढळून आले. यानंतर, पोलिसांनी या तिन्ही आरोपींना भिवंडीत आणले असून याप्रकरणी भिवंडी कोनगाव पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला.

## जाहीर स्तुती करायची असेल तर राजीनामा द्या अन् संघात जा

**RSS च्या कार्यक्रमाला गेलेल्या IPS विश्वास नांगरे पाटलांवर राज ठाकरेंचा घणाघात**

**मुंबई/नागपूर (दै. संध्या)**

नागपूरचे नवनियुक्त पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) एका कार्यक्रमाला हजेरी लावत संघाची स्तुती केल्याने राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी काँग्रेसने 'ऑल इंडिया सर्व्हिसेस कंडक्ट रुल्स'चा (सेवा नियमांचा) दाखला देत आधीच तीव्र आक्षेप नोंदवला होता. आता या वादात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उडी घेतली असून, त्यांनी नांगरे पाटील यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री असलेल्या फडणवीसांवरही सडकून टीका केली आहे. "तुम्हाला संघाबद्दल आपुलकी असेल तर सेवेचा राजीनामा द्या आणि संघात किंवा भाजपमध्ये सामील व्हा," असा थेट सल्ला राज ठाकरेंनी दिला आहे.

राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट शेअर करत या प्रकरणावर आपली रोखठोक भूमिका मांडली आहे. राज ठाकरे यांनी विश्वास नांगरे पाटील यांच्या 'दुहेरी निष्ठे'वर



कडक शब्दांत ताशेरे ओढले. ते म्हणाले, "एक पोलीस अधिकारी म्हणून नांगरे पाटलांची निष्ठा फक्त आणि फक्त पोलीस दलाच्या कर्तव्याशी असायला हवी. पण त्यांना त्यांची संघाशी असलेली निष्ठा दाखववीशी वाटत आहे. सध्या भरवली जाणारी हिंदू संमेलने अराजकीय असल्याचा देखावा केला जात असला, तरी ती राजकीयच आहेत." "एका पोलीस अधिकाऱ्याने तिथे जाऊन संघाची तोंडभरून स्तुती करणे म्हणजे निष्पक्षतेचे भान हरवणे आहे. तुम्हाला संघाबद्दल आपुलकी असेल, तर ती मनात ठेवा किंवा जाहीरपणे बोलायचं असेल तर सेवेचा राजीनामा द्या आणि संघात किंवा भाजपमध्ये सामील व्हा. सध्या तसंही मर्जीतल्या अधिकाऱ्यांसाठी 'पुनर्वसन हमी योजना' सुरु आहेच, तुमचंही पुनर्वसन नक्की होईल."

# गद्दारांनी आईची शपथ घेऊन विश्वासघात केला

## पुढचा खासदार आमचाच निवडून येणार : उद्धव ठाकरेंचा एल्गार

**यवतमाळ (दै. संध्या)**

"जी लोकं कालपर्यंत माझ्यासोबत होती आणि आज ती फुटली, या लोकांची मला लाज वाटते. माझ्या नावावर आणि माझ्या दौऱ्यांमुळेच हे खासदार निवडून आले होते. या गद्दारांनी चक्क आईची शपथ घेऊन गद्दारी केली आणि गद्दारांच्या कळपात जाऊन सामील झाले. म्हणूनच, या मतदारसंघात येऊन मी माझ्या मतदारांची जाहीर माफी मागण्यासाठी आलो आहे," अशा भावनिक शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांचे वाभाडे काढले. यवतमाळच्या महासभेत बोलताना त्यांनी बंडखोर खासदार संजय देशमुख यांचा एक जुना व्हिडिओही दाखवला. केंद्रीय यंत्रणा आणि सत्ताधाऱ्यांवर हल्ला चढवताना उद्धव ठाकरे म्हणाले, "यांनी आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरले, आमदार-खासदार फोडले तरीही ठाकरे आज ताठ कण्याने मैदानात उभा आहे. आमदार फोडल्यानंतरही शिवसैनिकांनी मेहनत करून या खासदारांना पुन्हा निवडून दिले होते, पण हे विकले गेले. सध्या राज्यात




निवडणुका नसतानाही ही फोडाफोडी सुरू आहे. पण मी सांगतो, जोपर्यंत जनतेचे प्रश्न संपत नाहीत, तोपर्यंत कोणीही ठाकरे किंवा शिवसेना संपवू शकणार नाही. जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याच मतदारसंघातून पुन्हा ठाकरेंचाच खासदार निवडून येईल." भाजपवर थेट निशाणा साधत उद्धव ठाकरे म्हणाले, "आज देशात राम मंदिराच्या दानपेटीतील पैसे चोरले जात आहेत. हे सरकार केवळ लूट करत आहे. हे खासदार म्हणतात की विकासनिधीसाठी आम्ही गेलो; पण मला सांगा, हा विकासनिधी काय फक्त भाजपच्या मालकीचा आहे का? तो जनतेच्या हक्काचा पैसा आहे." ६ खासदारांच्या बंडानंतर विदर्भातील पहिल्याच सभेत उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांना थेट गाडण्याचा इशारा दिला असून, या सभेला शिवसैनिकांनी अलोट गर्दी केली होती. उद्धव ठाकरे यांच्या यवतमाळ येथील जाहीर सभेत खासदार संजय राऊत यांनी बंडखोर खासदारांसह भाजपवर जोरदार टीका केली. "माझ्यासारखे लाखो निष्ठावंत शिवसैनिक आहेत, म्हणूनच शिवसेना आजही संकटात खंबीरपणे उभी आहे," असे सांगत त्यांनी पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे कौतुक केले. सभास्थळ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानात असल्याचा उल्लेख करत राऊत म्हणाले, "या बाजार समितीत शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, पण इथल्या खासदाराला ५० कोटींचा भाव मिळाला. मात्र, येणाऱ्या निवडणुकीत त्याची ५ रुपयांचीही किंमत राहणार नाही." तसेच, "गद्दारी करायची असेल तर आधी खासदारकीचा राजीनामा द्या आणि पुन्हा जनतेसमोर जाऊन निवडणूक लढवा," असे आव्हानही त्यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत राऊत म्हणाले, "१२ वर्षांत विकास झाला नाही, तर हे खासदार काय विकास करणार?" बंडखोर खासदार मोदींचे "बुट चाटायला" गेले, अशी जहरी टीकाही त्यांनी केली. "शिवसेना कधीच संपत नसते आणि यवतमाळ हा कायम बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांसोबत राहिलेला शिवसैनिकांचा जिल्हा आहे," असेही राऊत यांनी ठामपणे सांगितले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## यवतमाळच्या सभेतून संजय राऊतांचा बंडखोरांवर कठोर प्रहार

# तुमचा खासदार ५० कोटींना विकला गेला

**यवतमाळ (दै. संध्या)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या 6 खासदारांनी नुकतीच शिंदे गटात प्रवेश करत बंडखोरी केली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षबांधणीसाठी उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरू केला आहे. या दौऱ्याच्या निमित्ताने आज यवतमाळमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सभेत खासदार संजय राऊत यांनी बंडखोर खासदार संजय देशमुख आणि भाजपवर सडकून टीका केली. "यवतमाळचा खासदार 50 कोटींना विकला गेला," असा खळबळजनक आरोप करत राऊत यांनी त्यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत प्रहार केला.

सभेचे ठिकाण असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीचा संदर्भ देत राऊत यांनी बंडखोर खासदाराची खिल्ली उडवली. ते म्हणाले, "ही सभा कृषी उत्पन्न बाजार समितीत सुरू आहे. इथे शेतमालाला फारसा भाव मिळत नाही, पण पंधरा दिवसांपूर्वी इथे एक जण आला आणि तो 50 कोटींना विकला गेला. खऱ्या बाजारात त्याला कोणी पाच रुपयांनाही घेतलं नसतं. पण तो शिवसेनेत आला, उद्धव साहेबांनी त्याला खासदार केलं, त्याच्या खांद्यावर भगवी शाल टाकली,



म्हणूनच त्याची किंमत 50 कोटी झाली. मात्र, उद्याच्या निवडणुकीत त्याची किंमत पाच रुपयेही उरणार नाही."

बंडखोर खासदार विकासनिधीसाठी सत्ताधाऱ्यांसोबत गेल्याचा दावा करतात, यावर राऊत यांनी खरपूस समाचार घेतला. "तुम्ही कसला विकास करणार? गेल्या 12 वर्षांत नरेंद्र मोदी देशाचा विकास करू शकले नाहीत. त्यांच्या वाराणसीत जाऊन बघा, रस्ते नाहीत, पाणी नाही. ज्या मोदींनी देशाचा विकास केला नाही आणि ज्यांच्या लोकांनी राम मंदिराच्या दानपेटीतील दोन हजार कोटी रुपयांची लूट केली, त्यांचे बूट चाटायला हे लोक गेले आहेत," असा घणाघात राऊत यांनी केला.

खासदार संजय देशमुख यांच्यावर थेट निशाणा साधताना राऊत म्हणाले, "तुम्ही मशालीच्या चिन्हावर निवडून आलात. ही मतं लोकांनी उद्धव ठाकरे साहेबांना दिली होती. जर तुम्हाला गद्दारीच करायची असेल, तर राजीनामा द्या आणि पुन्हा निवडणुकीला उभे राहा. मग तुम्हाला कळेल की यवतमाळ-वाशिमची जनता कुणासोबत आहे." यावेळी निष्ठेबद्दल बोलताना त्यांनी अत्यंत आक्रमक विधान केले. ते म्हणाले, "एकनिष्ठ राहण्यासाठी 'आई नेक आणि बाप एक' असावा लागतो. आम्ही सगळे एकनिष्ठ आहोत आणि निष्ठावंतांचा हा सागर या गद्दारांना तुडवल्याशिवाय राहणार नाही." बंडखोरांच्या जाण्याने खचून न जाण्याचा सल्ला त्यांनी शिवसैनिकांना दिला. "खासदार गेले म्हणजे गेले, आता आपल्यासाठी ते मेले. आपण आता त्या दुखवट्याला आलेलो आहोत. त्यांचे दहावे-बारावे घाला आणि पुढल्या कामाला मोकळे व्हा. दुःख करत बसू नका," असे आवाहन राऊत यांनी केले. "शिवसेना आणि ठाकरे कधीच संपत नसतात, ते राखेतून पुन्हा उभे राहतात.

काल नागपुरात उद्धव साहेबांचे झालेले प्रचंड स्वागत जर मिंधेंनी पाहिले असते, तर शिवसेना जागेवरच असल्याचे त्यांना कळले असते. हे गद्दार गेले तरी शिवसेना त्यांच्या छाताडावर पाय देऊन पुन्हा एकदा विधानसभा आणि लोकसभेत जाईल," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. यवतमाळ हा कायम बाळासाहेब ठाकरेंवर प्रेम करणारा जिल्हा असल्याचे सांगत, यापुढे येथे गद्दारीची कीड लागू न देण्याचे आवाहन संजय राऊत यांनी जनतेला केले. राऊत यांच्या या आक्रमक भाषणामुळे यवतमाळमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आता यावर शिंदे गटाकडून काय प्रत्युत्तर येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विमानापेक्षा इमान महत्त्वाचं : एकनाथ शिंदे

**रायगड (दै. संध्या)**

■ उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यावर आणि फडणवीसांसह विमानप्रवासावरून टोला

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापले आहे. फुटलेल्या खासदारांच्या मतदारसंघात जाऊन उद्धव ठाकरे जाहीर सभा घेत असताना, त्यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगडावरून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरेंच्या विदर्भ दौऱ्यापासून ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या विमानप्रवासापर्यंत विविध मुद्द्यांवर शिंदे यांनी टोलेबाजी केली.

उद्धव ठाकरे फुटलेल्या खासदारांच्या मतदारसंघात सभा घेत असल्याबाबत विचारले असता शिंदे म्हणाले, “काय बोलणार मी? जाहीर सभा घ्यायला मीच त्यांना लावलं आहे. मी सगळ्यांना कामाला लावलं आहे.” यानंतर त्यांनी खोचक शब्दांत टीका करत म्हटले, "ही तर वरातीमागून घोडे अशी परिस्थिती आहे. सगळे जण निघून गेल्यावर आता हे पोहोचत आहेत. त्याचा काय उपयोग? 'जो हौद से गया, वो बूंद से नहीं आता'," असा टोला त्यांनी लगावला. शिवसेनेतील सहा खासदार शिंदे गटात दाखल झाल्यानंतर



उद्धव ठाकरे त्यांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहेत. मुंबईनंतर त्यांनी यवतमाळमध्ये सभा घेतली असून, पुढे इतर मतदारसंघांचाही दौरा नियोजित आहे.

उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरला जाताना एकाच विमानातून प्रवास केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले, “विमानापेक्षा इमान महत्त्वाचं असतं.” ते पुढे म्हणाले, "2019 मध्ये महाराष्ट्रातील जनतेने एकाच विमानातून प्रवास करण्यासाठी आम्हाला तिकीट दिलं होतं. पण त्यावेळी त्यांनी काँग्रेसच्या बुडत्या जहाजात बसण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आज जे काही घडत आहे, त्याची सुरुवात तेव्हाच झाली होती."

2019 च्या राजकीय घडामोडींचा संदर्भ देत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर पुन्हा निशाणा साधला. "देवेंद्र फडणवीस खूप हुशार आहेत. 2019 मध्ये कपटी मित्र किती घातक असतो, याचा अनुभव त्यांनी घेतला आहे. त्यामुळे यावर मला आणखी काही बोलण्याची गरज नाही," असे ते म्हणाले.

रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत सुरू असलेल्या चर्चेवरही शिंदे यांनी भाष्य केले. ते म्हणाले, “आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे म्हणून रायगडावर आलो आहोत. छत्रपतींच्या आशीर्वादाने सगळ्या गोष्टी व्यवस्थित होतील. रायगडच्या पालकमंत्रिपदाचा निर्णय लवकरच जाहीर होईल.” दरम्यान, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदासाठी मंत्री भरत गोगावले यांचे नाव चर्चेत असून, त्यांनाच ही जबाबदारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रायगडावरील तिथीनुसार आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्याबाबत बोलताना शिंदे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त रायगडावर शिवभक्त आणि मावळ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळतो आहे. प्रत्येकाने शिवरायांकडून प्रेरणा घ्यावी, त्यांचे गुण अंगीकारावेत, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल."

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या सभांमुळे आणि शिंदे यांच्या या प्रत्युत्तरामुळे शिवसेनेतील राजकीय संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे चित्र दिसत आहे. 2019 च्या घटनांचा संदर्भ देत दोन्ही गटांकडून आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरूच असून, आगामी काळात हा संघर्ष आणखी रंगण्याची चिन्हे आहेत.

## संपादकीय

# प्रेम, प्रतिष्ठा आणि एका खुनाची किंमत...

जागतिक वारसा यादीत नुकत्याच समाविष्ट झालेल्या लोहगडाचे नाव सध्या इतिहासामुळे नव्हे, तर एका थरारक हत्याकांडामुळे देशभर चर्चेत आहे. 'लोहगड मर्डर मिस्ट्री' म्हणून ओळखल्या जाऊ लागलेल्या या प्रकरणाने समाजाला अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न विचारण्यास भाग पाडले आहे.

लोहगड हा तरुणांच्या ट्रेकिंगसाठी आवडता किल्ला. त्यामुळे येथे अपघाताच्या घटना अधूनमधून घडत असतात. सुरुवातीला केतनच्या मृत्यूकडेही अपघात म्हणून पाहिले गेले. मात्र तपास जसजसा पुढे सरकला, तसतसे समोर आलेले वास्तव अंगावर काटा आणणारे होते. ज्याच्याशी काही दिवसांत विवाह होणार होता, त्याच केतनला त्याची होणारी पत्नी सियाने प्रियकर चेतनच्या मदतीने दरीत ढकलून ठार मारल्याचा आरोप समोर आला.

या घटनेनंतर केतन आणि सियाचे प्रेमळ क्षण दाखवणारे अनेक व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर व्हायरल झाले. दोघे आनंदी दिसत होते. लग्नाच्या तयारीत होते. मग अचानक एवढा टोकाचा निर्णय का? हा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, सियाचे चेतनवर प्रेम होते. मात्र कुटुंबीयांनी तिचे लग्न केतनसोबत ठरवले. दोन्ही कुटुंबे प्रतिष्ठित असल्याने लग्न मोडल्यास मानहानी होईल, अशी भीती आरोपींकडून व्यक्त करण्यात आली. पण ही भीती एका निष्पाप तरुणाचा जीव घेण्याइतकी मोठी ठरावी का?

आजच्या काळात तरुण-तरुणींना स्वतःचा जीवनसाथी निवडण्याचा अधिकार आहे. कुटुंबाचा दबाव असला तरी विवाहाला स्पष्ट नकार देण्याचा पर्याय उपलब्ध असतो. मतभेद होऊ शकतात, संघर्ष होऊ शकतो; पण त्याचे उत्तर हत्या असू शकत नाही. संवाद संपला की हिंसा सुरू होते आणि त्याचे परिणाम केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित राहत नाहीत. या एका कथित गुन्ह्यामुळे केतनचे आयुष्य संपले, तर सिया आणि चेतन यांचे भविष्यही तुरुंगाच्या भिंतीआड गेले. तीन कुटुंबे उद्ध्वस्त झाली. अनेकांचे आयुष्य कायमचे बदलून गेले.

या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, हा निर्णय क्षणिक रागातून घेतलेला नव्हता. तपासानुसार, खुनाचा कट काही दिवसांपासून आखला जात होता. अनेक प्रयत्न झाल्याचेही समोर येत आहे. म्हणजेच हा आवेशाचा नव्हे, तर नियोजनाचा भाग होता. यामुळे प्रकरण अधिक गंभीर बनते. याआधीही अशाच प्रकारच्या काही घटनांनी देशाला हादरवले आहे. प्रेमसंबंध, कौटुंबिक दबाव किंवा प्रतिष्ठेच्या नावाखाली हिंसेचा मार्ग स्वीकारण्याच्या घटना वाढताना दिसत आहेत. समाज आधुनिक होत असला तरी संवाद, विश्वास आणि भावनिक परिपक्वता कमी होत आहे का, असा प्रश्न या घटनांमधून निर्माण होतो. मानवी मनाचा गुंता हा विज्ञानालाही पूर्णपणे उलगडलेला नाही. एखादी व्यक्ती बाहेरून आनंदी दिसत असली तरी तिच्या मनात नेमके काय सुरू आहे, हे अनेकदा जवळच्या व्यक्तीलाही कळत नाही. म्हणूनच अशा घटना अधिक अस्वस्थ करतात.

या प्रकरणाचा न्यायालयीन निकाल येणे अद्याप बाकी आहे. तपासातून आणखी अनेक पैलू समोर येऊ शकतात. त्यामुळे कोणालाही दोषी किंवा निर्दोष ठरविण्याचा अधिकार न्यायालयालाच आहे. मात्र उपलब्ध माहितीतून एवढे निश्चितपणे म्हणता येईल की, संवादाऐवजी हिंसेचा मार्ग निवडल्यास त्याची किंमत अनेक निरपराध लोकांनाही चुकवावी लागते.

आजही सामाजिक माध्यमांवर केतन आणि सियाचे आनंदी क्षण दाखवणारे व्हिडिओ फिरत आहेत. कारच्या सनरूफमधून होणारी पुष्पवृष्टी, भविष्यातील स्वप्ने आणि चेहऱ्यावरील हसू पाहताना एकच प्रश्न मनात उरतो जर योग्य वेळी 'नाही' म्हणण्याचे धैर्य दाखवले असते, तर कदाचित एका तरुणाचा जीव वाचला असता आणि तीन कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले नसते.

## संस्कृत सुभाषित

दृष्टिपूतं न्यसेत् पादं, वस्त्रपूत पिबेज्जलम्।।
सत्यपूतां वदेद् वाचं, मन:पूतं समाचरेत्।।

नीट पाहूनच जमिनीवर पाऊल ठेवावे, पाणी नेहमी वस्त्रातून गाळून घ्यावे, सत्याने पवित्र झालेले वचन बोलावे, मनाला जे पवित्र आणि सत्य वाटेल तसे वर्तन करावे.

## गुरु वचन

### निराधारांची सेवा हेच आपले कर्तव्य

एक डॉक्टर गांधीजींच्या विचाराने खूपच प्रभावित होते. व गांधींच्या जवळचे होते. एकदा ते गांधीजीसोबत बडोदाहून अलाहाबादला पोहोचले. गांधीजी येणार असल्याची माहिती पूर्वीपासूनच होती. यामुळे स्थानकावर कार्यकर्त्यांच्या जमावाची चांगलीच गर्दी झाली होती. गांधीजीचे हात रिकामे होते पण डॉक्टर साहेबाच्या हातामध्ये एक बॅग होती. रेल्वेमधून खाली उतरताच एका कार्यकर्ता पुढे जाऊन डॉक्टरच्या हातातील बॅग घेऊ लागला. डॉक्टरने त्याला मनाई केली. त्यावेळी डॉक्टरचे लक्ष्य एका वयस्कर महिलेवर गेले. तिच्या कमरेला एक लहान मुलगा होता व दुसऱ्या हातामध्ये काही सामान होते. त्यामुळे तिला चालण्यास त्रास होत होता. डॉक्टर जमावाला धक्का देत त्या महिलेपर्यंत पोहोचले आणि म्हणाले, ताई आपल्याला खूप त्रास होत आहे. हे सामान माझ्याकडे द्या, मी तुम्हाला स्थानकाबाहेर नेऊन सोडतो. ती महिला लाजू लागली. त्यानंतर डॉक्टर म्हणाले, घाबरु नका मी काही चोर वगैरे नाही. तुमचे सामान कुठेही जाणार नाही. महिलेने आपले सामान डॉक्टराकडे दिले. तेव्हा दुसरे लोकही तिथे आले. एका कार्यकर्ता डॉक्टराच्या हातून सामान घेऊ लागला. तेव्हा ते म्हणाले, हे खूप हलके आहे. मला काही त्रास होत नाही. तुम्ही लोक त्याची मदत करा, ज्याला तुमच्या मदतीची गरज आहे. निराधारांची सेवा करणे आपले कर्तव्य आणि धर्म आहे.

## उपदेशकथा

### प्रोत्साहन

संमोहनशास्त्राचा जनक आबे फारीय (१७५६–१८२०) हा गोवेकर होता. कांदोली गावचा हा ख्रिस्ती मुलगा बापासह पोर्तुगालला गेला. लिस्बोआ, रोम येथे शिकून पंडित झाला. जन्मभर युरोपातच राहिला पण त्याला आपल्या गोव्याचा अभिमान होता. शणै गोयबाबांनी त्याचे कोकणीत चरित्र लिहलेय. मृत्यूपूर्वी एकच वर्ष आधी म्हणजे १८१९ मध्ये त्याने डर लरींश वू ाोशळश्र ड्डीलळवश (ज्ञानेनिद्रेचीकारणे) नावाचा ग्रंथ फ्रेंचमध्ये लिहून नाव मिळविले. एकदा लिस्बोआच्या राजमहालात त्याचे भाषण ठेवण्यात आले होते त्यावेळी पोर्तुगालमधील सारी विद्वत्सभा जमली होती. गोरे, गुलमिशावाले, तालेवार श्रोते. आबे फारीय गांगरला. त्याचे तीर्थरुप आडोशाला उभे होते. त्यांनी परिस्थिती ओळखून कोकणीत धीर दिला. 'कातर रे भाजी!' अकलमंदको इशारा काफी असतो (सूज्ञाला सूचनाही पुरेसे असते.) म्हणतात. मग टाकळ्याची भाजी चिरावी तितक्या सहजतेने त्याने धडाधड भाषण दिले. 'वाहवा' चा पाऊस पडला. मायबोलीतील दोन शब्दांनी जणू आईने पाठ थोपटावी असे काम केले होते.

कथा उपदेश : 'तू फक्त लढ, मी तुझ्या पाठीशी आहे.' एवढे प्रोत्साहनपर शब्द पुरेसे होतात.

## पंचांग

पंचांग
२८ जून २०२६
रविवार
विक्रम संवत्– २०८२
निज ज्येष्ठ शके
संवत्– १९४८
संवत्सर – पराभवनाम
अयन– दक्षिणयन
मास– निज ज्येष्ठ
ऋतु– सौर ग्रीष्म
शुक्ल पक्ष
तिथि:चतुर्दशी
२७:०६:४०+
नक्षत्र:ज्येष्ठा

२५:०८:३०+
योग:शुभ १३:२८:५७
करण:गर १३:५५:१६
करण:वणिज
२७:०६:४०+
सूर्य:मिथुन
चन्द्र:वृश्चिक
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – मोहरम
तारीख – १२
विशेष
पौर्णिमा प्रारंभ
उ. रात्रौ ३.०६

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | | | | 2 | 9 | 5 |
| | | 2 | 8 | | | | 4 | |
| | | 6 | 9 | 4 | 2 | 1 | | 8 |
| | | 9 | 2 | 5 | | | | |
| 6 | | | 4 | | 7 | | | 1 |
| | | | | 9 | 6 | 5 | | |
| 4 | | 1 | 6 | 2 | 9 | 7 | | |
| | 3 | | | | 1 | 4 | | |
| 9 | 6 | 5 | | | | 8 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९९३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 7 | 2 | 5 | 8 | 9 | 6 | 3 |
| 2 | 9 | 6 | 7 | 3 | 4 | 1 | 5 | 8 |
| 3 | 8 | 5 | 6 | 1 | 9 | 2 | 4 | 7 |
| 5 | 4 | 2 | 8 | 7 | 6 | 3 | 9 | 1 |
| 1 | 3 | 8 | 9 | 4 | 5 | 7 | 2 | 6 |
| 7 | 6 | 9 | 1 | 2 | 3 | 5 | 8 | 4 |
| 8 | 7 | 1 | 5 | 6 | 2 | 4 | 3 | 9 |
| 9 | 5 | 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 2 |
| 6 | 2 | 4 | 3 | 9 | 1 | 8 | 7 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०९८ – पहिली क्रुसेड – ख्रिश्चन सैन्याने ईराकमधील मोसुल शहर जिंकले.
- १२४३ – इनोसंट चौथा पोपपदी.
- १३८९ – ओट्टोमन सैन्याने कोसोव्हो येथे सर्बियाला हरवले व युरोपविजयाची मुहुर्तमेढ रोवली.
- १५१९ – चार्ल्स पाचवा पवित्र रोमन सम्राटपदी.
- १६३५ – ग्वादालुपे फ्रांसची वसाहत झाली.
- १६५१ – बेरेस्टेक्झोची लढाई.
- १७६३ – हंगेरीतील कोमारोम शहरात भूकंप.

### राष्ट्रीय

- २००८ – पश्चिम उत्तरप्रदेशातील मुजफ्फरनगरमधील ७० वर्षीय वृद्धेने एक पुत्र व एक कन्या असा जुळया मुलांना जन्म दिला.

### जन्म

- १२४३ – गो–फुकुसाका जपानी सम्राटचा जन्म.
- १४७६ – पोप पॉल चौथा याचा जन्म.
- १४९१ – हेन्री आठवा, इंग्लंडचा राजाचा जन्म.
- १८८३ – पियरे लव्हाल फ्रांसचा पंतप्रधानचा जन्म.
- १९२१ – पी. व्ही. नरसिंहराव भारतीय पंतप्रधानचा जन्म.
- १९२६ – मेल ब्रूक्स, अमेरिकन चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, अभिनेताचा जन्म.
- १९३० – इतमार फ्रँको ब्राझिलचा राष्ट्राध्यक्षचा जन्म.

### निधन

- ०७६७ – पोप पॉल पहिला याचे निधन.
- ११९४ – झियाओझाँग, साँग वंशाचा चीनी सम्राटाचे निधन.
- १८३६ – जेम्स मॅडिसन, अमेरिकेचा राष्ट्राध्यक्षाचे निधन.
- १९१३ – मनोएल फेराझ दि कॅम्पोस सॅलेस, ब्राझिलचा राष्ट्राध्यक्षाचे निधन.

## : SMS :

Munna: Meray paas ek buri khabar hai, aur aik buhat hi buri khabar hai teray wastay.
Patient: Acha to pehlay buri khabar suna daal.
Munna: Apun k paas jo teri report pahunchi us mien likha tha k teray paas sirf 24 ghantay hain zinda rehnay k liye.
Patient: Sirf 24 ghantay. is say buri khabar kya ho sakti hai.
Munna: (Jadu ki Japhhi Dalte Hoauy) Mien kal say teray tak pahunchnay ki koshish kar raha hoon.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| पुणे | ३१.४ | २२.५ |
| पंढरपूर | ३५ | २४.७ |
| औरंगाबाद | ३४.७ | २५.२ |
| अहमदनगर | ३३.४ | २३.४ |
| अकोला | ३५.६ | २८.९ |
| अमरावती | ३६.७ | २७.४ |
| बीड | ४१.६ | २६ |
| भंडारा | ४२.७ | २९.९ |
| बुलढाणा | ४४.३ | ३०.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पश्चिम
सरकारी कामे वेळेवर पूर्ण होण्याची शक्यता आहे. मौजमजा करण्याकडे कल वाढेल.

**तूळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण
दुसऱ्यावर विश्वास न ठेवता स्वत:च्या विचाराने काम करा.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पश्चिम
शुभ, मंगल आणि धार्मिक कार्यात पैसे खर्च होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
अपेक्षेपेक्षा जास्त फायदा झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. विरोधकांपासून सावधान रहा.

**मिथून :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर
विनम्रतेने आणि सांमजस्याने कामे केल्यास प्रत्येक कामात यश मिळण्याचा योग आहे.

**धनू :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व
नवीन संबंध निर्माण होतील. सदभाव ठेवा योग्य फळ मिळेल. व्यापारामध्ये विस्तार होण्याचे योग आहेत.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : उत्तर
सत्कार्याची आवड निर्माण होईल. फायद्याचे अनेक मार्ग सापडतील. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** शुभ रंग : जांभळा,शुभ दिशा:उत्तर
उद्योगधंदा साधारण राहील. प्रयत्न अधिक केल्यास कामात जास्तीचे यश मिळू शकते.


**सिंह :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण
प्रतिष्ठित लोकांशी भेटी होतील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
चांगली बातमी आपला उत्साह वाढविणार आहे. काम करण्याच्या स्थितीत सुधारणा होईल.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण
अचानक लाभ होऊन आपल्याला प्रसिद्धी मिळू शकते. व्यापारामुळे प्रवास होऊ शकतो.

**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर
एखादी आनंदाची बातमी मनाची प्रसन्नता वाढवील. मुलांसंबंधातील कामात प्रगती होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९४



### आडवे शब्द

१. जनजगृतीसाठी पहाटेचा फेरफटका
५. काका–मामासाठी एकच शब्द (इंग्रजी)
७. द्विज
९. शिवसेनाप्रमुखांचे आडनाव
११. गजऱ्यातील सुगंधी पाने
१२. तपश्चर्येने येणारे सामर्थ्य
१३. जाण, पाचपोच
१४. इच्छा
१५. मऊ पदार्थाचा आघात
१६. यमपुरी
१७. भगवद्गीतेचा समावेश असणारे महाकाव्य
२०. पवित्र
२१. भविष्यकथनाची एक विद्या
२३. श्रेष्ठ पुरुष
२४. दुप्पट आकाराची पोळी?
२७. ढीग
२८. अभिवादन
३०. दंग, चूर
३१. चक्कर, फेरी
३४. घाऊक व्यापार
३५. मनाला आलेला थकवा
३७. मालाचे येणे–जाणे
३९. चाळीस शेर
४०. सापाची विषारी जात
४२. वाईट
४४. नवरदेव
४५. फार पूर्वीपासूनचे, ज्याच्या आरंभ काळाचा थांग नाही असा
४६. वरपांगी
४८. धनुष्याचा ताणलेला दोरीचा आवाज
४९. डावी बाजू, बायको
५१. डोंगराचा तुटलेला उभा भाग
५२. निस्तेज, गळून गेलेला
५४. पुन्हा पुन्हा
५७. हाताचा 'भविष्य लिहिलेला' भाग
५८. लहान वयात अभिनय करणारा
६०. रस्ता
६१. जाडसर पीठ
६२. सिंहासारखा बलाढ्य माणूस
६४. मोकळाढाकळा, लांब–रूंद
६६. फिकीर, काळजी
६७. मदन, महादेव
६८. स्थावर मिळकत वापरण्याबद्दल दीर्घ मुदतीचा करार
७०. आरोप
७१. नदीची पलीकडची बाजू
७२. वरवधूची मिरवणूक
७३. चांगला
७४. क्वचित
७५. हिंदीत वय

### उभे शब्द

१. सुंदर तरुणी
२. वजन, बोजा
३. ग्रामीण बोलीत तेव्हा
४. रीतीप्रमाणे
५. आकाश
६. केस काळे करण्याचे साधन
७. माझे
८. गणपती
९. यंदाच्या साहित्य संमेलनाचे स्थानिक आयोजक–प्रेक्षक
१०. विपुलता
१३अ. आशीर्वाद
१४. धन्यवाद
१७. करपलेला भाग
१८. आधाशी
१९. अति खाण्याने पोटाला लागलेली ओढ
२०. फलक, टोपली
२२. अन्न घशाशी येणे
२३. नष्ट होणारे
२५. सडेतोड
२६. युद्ध
२७. दशावतारापैकी सातवा
२९. साखळी असलेला दिवा
३२. पोषाख
३३. आरास, देखावा
३६. येरझरा, जाणे–येणे
३८. महाराष्ट्रीय जेवणातील दोन मुख्य पदार्थ
३९. बंदी
४१. पृथ्वीचा तळ
४३. भरभराट
४५. वनवास
४७. सहा आसनी रिक्षांना बोली भाषेतील नाव
५०. आपला–परका भेद
५३. चोरलेला पैसा, माल इ.
५५. पौराणिक अश्वाहन
५६. हिंदीत कीव
५८. शरद पवारांचा जुना मतदारसंघ
५९. पटकन, त्वरित
६३. महासर्प
६४. आर्थिक पत, देण्याची शक्ती
६५. जुगार
६६. म्हणीतील त्रिदल
६९. रांजण
७१. रुपयाचा शंभरावा भाग

### जम्बो शब्दकोडे क्र. ९९२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कादंबरी ४.उपकार ७.गुलकंद ११.रतन १३.मासला १५.दवाखाना १७.कोळसा १८.वीरगती २०.नमन २२.तहान २४.करडई २६.समरगीत २९.कण ३१.चरचरीत ३२.पलटण ३३.कलाकार ३५.कोरा ३६.रडार ३७.भंगार ३८.सखी ३९.मग ४१.खराटा ४३.मानव ४४.संततधार ४५.रजई ४७.बाक ४८.लवंगी ४९.ममता ५१.पाव ५२.कढत ५४.तबेला ५७.रत्नाकर ५९.राज ६१.व ६२.लाजलावणा ६४.मस्त ६५.कोरस ६७.देश ६८.रातराणी ७०.काल ७१.सह ७२.कलकल ७५.देव ७७.वाह्यात ७९.क्षमायाचना ८२.कारा ८४.सरस ८५.पवन ८६.रवरवणे

उभे उत्तर : १.कानकोरणी २.बरसात ३.रीत ५.परागकण ६.रमा ७.गुलाम ८.कंद ९.दवा १०.दैना १२.नवीन १४.सनई १६.खाजगी १९.तीर २१.नस २३.हातचलाखी २५.डबल २७.मधुकर २८.तयार २९.कतरबेत ३०.क्षणभंगुर ३१.चरा ३२.परमधाम ३४.कावराबावरा ३५.कोनमापक ३८.सवलत ४०.गरम ४२.टाक ४४.संगीत ४६.जनक ५०.तारणारा ५३.नावरस ५५.बेलाशक ५६.लाज ५८.रमणी ६०.जहाल ६३.लायक ६६.सहवास ६९.तनया ७०.कावकाव ७३.लहान ७४.लक्षण ७६.खास ७८.तप ८०.चर ८१.नाव ८३.राणे

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय (अभिमत) विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ



## विद्यार्थ्यांनी भारतीय मूल्ये, नैतिकता आणि 'वसुधैव कुटुंबकम्'चा संदेश जगभरात पोहोचवावा– राज्यपाल जिष्णू देव वर्मा

प्र कुलपती डॉ. येरवडेकर यांनी प्रास्ताविकात विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक प्रगती सोबत सिम्बायोसिस संस्थेच्या प्रगतीचा आलेख मांडला.

पुणे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात युवकांनी केवळ व्यावसायिक यशावर लक्ष केंद्रित न करता भारतीय मूल्ये, नैतिकता, करुणा आणि जबाबदारीची जाणीव जपत नेतृत्व करावे. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय (अभिमत) विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी 'वसुधैव कुटुंबकम्'चा संदेश, भारताची संस्कृती आणि मूल्ये आपल्या देशात पोहोचवावीत, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.

लवळे येथील सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या परिसरात आयोजित आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पदवीदान समारंभ-२०२६ मध्ये ते बोलत होते. यावेळी सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष,अभिमत विद्यापीठाचे कुलपती प्रा.डॉ.एस. बी. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रामन, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, मुंबई येथील फ्रान्सचे महावाणिज्यदूत पॅट्रिक लेव्हेरिनो, सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष हेन्री तेबांडेके आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, आज जग परिवर्तनाच्या उंबरठ्यावर असून कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल घडवून आणत आहे. अशा काळात युवकांनी 'तुम्ही काय करता' यापेक्षा 'ते कसे करता' याला अधिक महत्त्व द्यावे. त्यासोबतच प्रत्येक कृतीमध्ये नैतिकता, करुणा आणि प्रामाणिकपणा असणे आवश्यक आहे.

नेतृत्व म्हणजे केवळ राजकीय किंवा प्रशासकीय पद नव्हे, तर प्रत्येक व्यक्ती आपल्या आचरणातून नेतृत्व करू शकते. योग्य कृती आणि उच्च मूल्ये समाजाला अधिक सक्षम बनवतात. भारतीय संस्कृतीतील 'धर्म' म्हणजे मनाला उन्नत करणारी मूल्ये जपणे होय, असेही त्यांनी सांगितले.

राज्यपाल पुढे म्हणाले, महान संस्था या दूरदृष्टी असलेल्या व्यक्तिमत्त्वांमुळे उभ्या राहतात. सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. एस. बी. मुजुमदार यांनी 'वसुधैव कुटुंबकम्' या उदात्त तत्त्वज्ञानावर आधारित संस्था उभारून जगभरातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे कार्य केले आहे. ही संस्था केवळ शिक्षण देत नाही, तर विद्यार्थ्यांच्या मनाची आणि व्यक्तिमत्त्वाचीही जडणघडण करते.

सिम्बायोसिसमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अधिक मोठी सामाजिक जबाबदारी आहे. पदवी घेऊन मायदेशी परतताना त्यांनी भारताची संस्कृती, येथील मानवी मूल्ये, मैत्री आणि पुण्याच्या समृद्ध परंपरेच्या आठवणी सोबत घेऊन जाव्यात, अशी अपेक्षाही राज्यपाल महोदयांनी व्यक्त केली.

फ्रान्सचे महावाणिज्यदूत पॅट्रिक लेव्हेरिनो यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना भारत-फ्रान्स मैत्री, शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यावर भर दिला. भारत आणि फ्रान्समधील दीर्घकालीन धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत होत असून २०२६ हे 'भारत-फ्रान्स नवोपक्रम वर्ष' म्हणून साजरे केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी केवळ पदवीच नव्हे तर जागतिक दृष्टीकोन, विविध संस्कृतींचा आदर आणि मानवतेची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. फ्रान्समधील उच्च शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी, जागतिक दर्जाची विद्यापीठे तसेच ८०० हून अधिक फ्रेंच कंपन्यांमुळे रोजगाराच्या उपलब्ध संधींची माहिती त्यांनी दिली.

डॉ. मुजुमदार म्हणाले, भारतातील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर भारतीय संस्कृती, विविधता, लोकशाही आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या मूल्यांचा अनुभव मिळतो. परदेशात शिक्षण घेतल्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, हे महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदाहरणांद्वारे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाज आणि देशाच्या विकासासाठी करावा, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे महापालिकेतून 'हार्ड डिस्क' चोरी ! कोणी केली चौकशीची मागणी

पुणे (दैनिक संध्या) :'महापालिकेच्या सर्व्हर रूममधून मिळकत कर विभागाशी संबंधित माहिती असलेली हार्ड डिस्क चोरीला गेल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. गेल्या महिन्यात महापालिकेच्या सर्व्हर रूम मधून एक हार्ड डिस्क गायब झाल्याचे समोर आले होते. सर्व्हर रूम मधील हार्ड डिस्क चोरीला गेल्याचे समोर आल्यानंतर खडबडून जागे झालेल्या महापालिका प्रशासनाने त्याची चौकशी सुरू केली. सर्व्हर रूमच्या आजूबाजूला सुरक्षिततेसाठी लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली असता ज्या कर्मचाऱ्याकडे सर्व्हर रूमच्या दुरुस्तीची जबाबदारी होती. त्यातील एका व्यक्तीने ही हार्ड डिस्क गायब केल्याचे दिसून आले. हा कर्मचारी ठेकेदारामार्फत महापालिकेच्या सेवेत काम करत होता. संबंधित व्यक्तीने सर्व्हर रूम मधील हार्ड डिस्क चोरून घरी नेल्यानंतर १५ दिवसानंतर महापालिका प्रशासनाच्या लक्षात ही गोष्ट आली. सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे चित्रीकरण पाहिल्यानंतर त्या व्यक्तीला बोलावून त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने वैयक्तिक कारणासाठी हार्ड डिस्क नेल्याची कबुली दिली. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याला दम देऊन त्याच्याकडून हार्ड डिस्क ताब्यात घेतल्याची माहिती महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत देखील दिली होती. या हार्ड डिस्क मध्ये नागरिकांकडून गोळा केलेल्या महत्त्वाच्या माहितीचा समावेश असल्याचेही सर्वसाधारण सभेत सांगण्यात आले होते. संबंधित कर्मचाऱ्याने हार्ड डिस्क गायब केल्याने शहरातील लाखो नागरिकांची महत्त्वाची माहिती इतरांच्या हातात गेल्याचे समोर आले होते. मात्र त्यानंतर महापालिका प्रशासनाने या व्यक्तीच्या विरोधात पोलिसात तक्रार केली नसल्याचेही समोर आले होते.

### कर्करोग उपचाराचा 'पुणे पॅटर्न' जगभर चर्चेत !

पुणे (दैनिक संध्या) : कर्करोगावरील उपचारांचा वाढता खर्च, केमोथेरपी आणि रेडिओथेरपीचे गंभीर दुष्परिणाम तसेच रुग्णांच्या जीवनमानाचा प्रश्न यामुळे जगभरात आरोग्य क्षेत्र नव्या पर्यायांचा शोध घेत आहे. अशा वेळी पुण्याजवळील वाघोली येथे गेल्या तीन दशकांपासून सुरू असलेल्या एका संशोधनाधिष्ठित प्रयोगाने देश-विदेशातील वैद्यकीय क्षेत्राचे लक्ष वेधून घेतले आहे. आधुनिक कर्करोग उपचार आणि आयुर्वेद यांचा समन्वय साधणाऱ्या 'इंटिग्रेटिव्ह ऑन्कोलॉजी' या संकल्पनेला भारतात आकार देणारे ज्येष्ठ कर्करोगतज्ज्ञ डॉ. अरविंद विष्णू कुलकर्णी, आयुर्वेदाचार्य डॉ. सदानंद सरदेशमुख आणि भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट यांचे कार्य आज जागतिक स्तरावर चर्चिले जात आहे. वाघोली येथील 'इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटर' (आयसीटीआरसी) हा या प्रयोगाचा केंद्रबिंदू आहे. सुमारे ६० एकर परिसरात उभ्या असलेल्या 'भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट' या संस्थेच्या या प्रकल्पाने गेल्या तीन दशकांहून अधिक काळात १७ हजारांहून अधिक कर्करोग रुग्णांना उपचार आणि मार्गदर्शन दिल्याचा संस्थेचा दावा आहे. आधुनिक ऑन्कोलॉजी आणि आयुर्वेदाचा वैज्ञानिक पद्धतीने संगम घडवून आणण्याचा हा देशातील पहिल्या प्रयत्नांपैकी एक मानला जातो. इंटिग्रेटिव्ह ऑन्कोलॉजी म्हणजे आधुनिक वैद्यकाला पर्याय देणारी पद्धत नाही. उलट शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी आणि इतर आधुनिक उपचारपद्धतींसोबत आयुर्वेदीय उपचारांची शास्त्रीय जोड देण्याची ही संकल्पना आहे. मुळात कर्करोग शरीरात का आणि कसा उदभवतो यावर सध्या जगभर संशोधन चालू आहे. कर्करोगाचे निदान झाल्यानंतर पेशीस्तरावर मुकाबला आधुनिक वैद्यकाद्वारे केला जातो.

---

## 'ऑनलाइन बँकिंग' सुविधेच्या आमिषाने डॉक्टर महिलेची फसवणूक

पुणे (दै. संध्या)

बँकेतून बोलत असल्याची बतावणी करुन ज्येष्ठ महिलेची सायबर चोरट्यांनी पावणेतीन लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ७४ ज्येष्ठ महिला या एरंडवणे भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. त्या डॉक्टर आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर १० जून रोजी संपर्क साधला. बँकेतून बोलत असल्याची बतावणी केली. बँकेकडून तुम्हाला ऑनलाइन बँकिंग सुविधा देण्यात येणार आहे, अशी बतावणी चोरट्यांनी केली. तुम्ही बँकेत येण्याची गरज नाही, असे सांगण्यात आले. त्यानंतर चोरट्यांनी ऑनलाइन बँकिंग सुविधा उपलब्ध करुन देतो, असे सांगून त्यांना एक एपीके फाइल पाठविली. ही फाइल उघडताच चोरट्यांनी महिलेच्या मोबाइलचा तांत्रिक ताबा घेतला. चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून दोन लाख ७८ हजार रुपयांची रोकड लांबविली. अलंकार पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी (ऑनलाइन टास्क) असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका तरुणीची सात लाख दहा हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत एका तरुणीने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी ही महर्षीनगर परिसरात राहायला आहे. सायबर चोरट्यांनी १५ जून रोजी तरुणीच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला. घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी, असे आमिष चोरट्यांनी तरुणीला दाखविले.

---

## 'महात्मा फुले वाड्या'तील वटपूजनावरील बंदी मागे

### हिंदु जनजागृती समितीसह हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या पाठपुराव्याला यश

पुणे (दै. संध्या)




पुण्यातील ऐतिहासिक महात्मा फुले वाडा परिसरातील वटवृक्षाच्या पूजनावर पुरातत्त्व विभागाने घातलेली बंदी अखेर शासनाने मागे घेतली असून, हिंदु जनजागृती समिती, राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती, हिंदु राष्ट्र समन्वय समिती, सुराज्य अभियान आणि रणरागिणी शाखा आदी संघटनांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. या निर्णयानंतर संबंधित संघटनांनी समाधान व्यक्त केले असून बंदी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही केली आहे.

महात्मा फुले वाडा परिसरातील वटवृक्षाच्या पूजनावर संभाव्य निर्बंध घालण्यात आल्यानंतर संबंधित हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या शिष्टमंडळाने पुरातत्त्व विभाग, पोलीस प्रशासन तसेच पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालयात निवेदने सादर करून ही बंदी तातडीने मागे घेण्याची मागणी केली होती. या निवेदनात हा निर्णय हिंदू महिलांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर आघात असल्याचा दावा करण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वाहने यांनी खडक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पत्र पाठवून महात्मा फुले वाडा हे राज्य संरक्षित स्मारक घोषित होण्यापूर्वीपासून सुरू असलेल्या परंपरा व चालीरीती कायम ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच वटपौर्णिमेच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास सांगितले आहे.

या निर्णयावर प्रतिक्रिया व्यक्त करताना हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी फुले वाड्यासमोरील वटवृक्षाचे पारंपरिक वटसावित्री पूजन रोखण्याचा आदेश मागे घेण्यात आल्याचे स्वागत केले. समितीने केलेला विरोध आणि अधिवक्त्यांनी दिलेल्या कायदेशीर नोटिशीनंतर प्रशासनाने हा निर्णय बदलल्याचे त्यांनी म्हटले. तसेच राज्य सरकारने संबंधित प्रकरणातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारचे आदेश दिले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

या निर्णयानंतर हिंदु जनजागृती समितीच्या वतीने श्री. रमेश शिंदे यांनी हिंदू महिलांना महात्मा फुले वाडा येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहात वटवृक्षाचे पूजन करण्याचे आणि धार्मिक परंपरा जपत या निर्णयाचे स्वागत करण्याचे आवाहन केले आहे.

---

## अमली पदार्थ सेवन विरोधी व तस्करी विरोधी दिन उत्साहात साजरा

काऱ्हाटी (दै. संध्या)

■ कृषी उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी व सुपा पोलीस स्टेशन (पुणे ग्रामीण) यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन



कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था,काऱ्हाटी व सुपा पोलीस स्टेशन (पुणे ग्रामीण) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अमली पदार्थ सेवन विरोधी व तस्करी विरोधी दिन विविध जनजागृतीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी संकुलातील प्राथमिक शाळा, वसतिगृह विद्यालय,गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल,कनिष्ठ महाविद्यालय तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) विभागातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहभागातून सर्व्हिस रस्ता ते मुख्य कार्यालय या मार्गावर व्यसनमुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले अमली पदार्थांच्या दुष्परिणामांवर आधारित आशयघन पोस्टर्स हातात घेऊन विविध घोषणांद्वारे नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश दिला. रॅलीनंतर आयोजित कार्यक्रमात विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे सामाजिक,शारीरिक व मानसिक दुष्परिणाम याविषयी प्रभावी मनोगते व्यक्त केली.तसेच उत्कृष्ट पोस्टर सादर करणाऱ्या व प्रभावी मनोगत व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास सुपा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. मनोजजी नवसारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तसेच कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेचे कार्यकारी अधिकारी,संकुलातील विविध विभागांचे प्राचार्य,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी तसेच सुपा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.विशाल मदने यांनी केले तर छायाचित्रण श्री.स्वप्नील धुमाळ व श्री.प्रतीक कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन श्री.नवनाथ शिरसाट व सर्व विभागांचे समन्वयक यांनी केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थित सर्वांनी "मी अमली पदार्थांचे सेवन करणार नाही आणि इतरांनाही व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रोत्साहित करीन," अशी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. अशी माहिती संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ यांनी दिली.

---

## सिया आणि चेतनचं ऑक्टोबर २०२५ पासून अफेअर?

पुणे (दै. संध्या)



१८ जूनला केतन अग्रवाल या तरुणाला लोहगडावरुन धक्का देऊन सिया गोयलने ठार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सियाला तिचा प्रियकर चेतन चौधरीने साथ दिल्याचंही समोर आलं. या दोघांवर हत्येचा आरोप असल्याने दोघांना अटक करण्यात आली आहे. सिया आणि केतन यांचं लग्न डिसेंबर महिन्यात होणार होतं. पण सियाला केतन नाही तर चेतन आवडत होता. त्यामुळे तिने केतनची लोहगडावरुन धक्का देऊन हत्या केली आणि तो अपघात आहे असं भासवलं. या प्रकरणी रोज नवनवे खुलासे होत आहेत. सिया आणि चेतन यांनी केतनच्या मृत्यूनंतर चॅट डिलिट केले होते अशी माहिती आता समोर आली आहे. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार सिया आणि चेतन या दोघांचे मोबाइल हे फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. कारण या दोघांनीही केतनच्या मृत्यूनंतर एकमेकांना पाठवलेले मेसेज डिलिट केल्याचं आम्हाला कळलं आहे. पोलिसांनी २३ जून ला सिया गोयल आणि चेतन चौधरी या दोघांना अटक केली. १८ जूनला जेव्हा केतनचा मृत्यू झाला तेव्हा सिया त्याच्यासह लोहगडावर गेली होती. तिने चेतनलाही बोलवून घेतलं होतं अशीही माहिती समोर आली. त्यानंतर आता केतनच्या मृत्यूनंतर ही या दोघांनी चॅट डिलिट केल्याचीही माहिती पोलिसांनी दिली आहे.

---

# भगवान महावीर फाउंडेशनकडून ३०व्या राष्ट्रीय महावीर पुरस्कार

पुणे (दै. संध्या)

■ २०२६ साठी महाराष्ट्रातून नामांकने केली आमंत्रित

■ अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यक, समुदाय व सामाजिक सेवा या क्षेत्रांतील मानवी प्रयत्न आणि उत्कृष्टतेचा सन्मान करणारे पुरस्कार

■ २६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील १०१ परिवर्तनकर्त्यांना गौरव, महाराष्ट्राला आदर्श समुदायआणि सामाजिक सेवेसाठी अकरा पुरस्कार

■ माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती एम. एन. वेंकटचलैय्या यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवर ज्युरी

करुणा, सेवा आणि सामाजिक प्रभावाच्या तीन दशकांच्या उत्सवाचे औचित्यसाधत, भगवान महावीर फाउंडेशनने प्रतिष्ठित राष्ट्रीय महावीर पुरस्कारांच्या ३०व्या आवृत्तीसाठी नामांकन मागविली आहेत. अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यक तसेच समुदाय व सामाजिक सेवा या क्षेत्रांत असामान्य व्यक्ती आणि संस्थांनी केलेल्या निस्वार्थ सेवेला सन्मानित करणाऱ्या भारतातील सर्वात प्रतिष्ठित पुरस्कारांपैकी हे एक आहेत; या कार्यामुळे जीवनांमध्ये आणि समुदायांमध्ये परिवर्तन घडून आले आहे. प्रत्येक पुरस्कारास ₹१० लाखांचे रोख पारितोषिक, प्रशस्तिपत्र आणि स्मृतिचिन्ह प्रदान केले जाते.नामांकनांची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. सीमा ओलांडून सेवाभावाचा सन्मान करत, भगवान महावीर फाउंडेशनने गेल्या तीन दशकांत, तसेचअलीकडे जाहीर झालेल्या २९व्या आवृत्तीसह, २६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील १०१ अपवादात्मक व्यक्ती आणि संस्थांचा गौरव केला आहे. तमिळनाडूनंतर दुसऱ्या क्रमांकाची म्हणजेच अकरा राष्ट्रीय महावीर पुरस्कारांची नोंद महाराष्ट्राच्या खात्यात आहे, ज्यामुळे राष्ट्रीय महावीर पुरस्कारांच्या वारशात महाराष्ट्राचे लक्षणीय योगदान अधोरेखित होते. सामाजिक विकास, मानवतावादी सेवा आणि अहिंसेच्या प्रसारातील आदर्श कार्यासाठी या परिवर्तनकर्त्यांना सन्मानित केले जाते.

महाराष्ट्रातील राष्ट्रीय महावीर पुरस्कार विजेते खालीलप्रमाणे (ज्यांना पुरस्कार मिळाले आहे असे) श्री रतनलाल सी. बाफना, जळगाव (१९९७), श्री अण्णा हजारे, राळेगण (१९९७), साधू वासवानी मिशन, पुणे (१९९८), डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे, हेमलकसा (१९९८), डॉ. कल्याण मोतीलाल गंगवाल, पुणे (२०००), डॉ. शरदकुमार डिक्सीट चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे (२००६), महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम (२००८), द इंडियन प्लॅनेटरी सोसायटी, मुंबई (२०११),स्नेहालय सोशल चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर (२०११), सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन अँड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ , गडचिरोली (२०२२) आणि सरहद, पुणे (२०२५)

गरजू, वंचित आणि निराधारांच्या कल्याणासाठी निःस्वार्थ सेवेत कार्यरत भारतीय नागरिक आणि संस्था नामांकनासाठी पात्र आहेत. पुरस्कार विजेत्यांची निवड भारताचे माजी सरन्यायाधीश मा.न्यायमूर्ती एम. एन. वेंकटचलैय्या यांच्या अध्यक्षतेखालील मान्यवर परीक्षक मंडळाकडून केली जाईल, ज्यामुळे पुरस्कारांच्या प्रतिष्ठेला साजेसा काटेकोर आणि विश्वसनीय मूल्यांकन प्रक्रिया सुनिश्चित होईल.

महावीर पुरस्कारांसाठी परीक्षक मंडळ खालीलप्रमाणे : न्यायमूर्ती एम.एन. वेंकटचलैय्या, भारताचे माजी सरन्यायाधीश–अध्यक्ष,महा वीरपुरस्कार,न्यायमूर्तीडी.वाय.चंद्र चूड,भारताचेमाजीसरन्यायाधीश, एस.गुरुमूर्ती, संपादक, तुघलक आणिअंशकालीन संचालक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,प्रा. बी.एम.हेगडे, अध्यक्ष, भारतीय विद्या भवन,मंगळूर केंद्र, टी.एस. कृष्णमूर्ती, भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त,डी.आर.मेहता, माजीअध्यक्ष, सेबी,प्रभात कुमार, भारत सरकारचे माजी कॅबिनेट सचिव आणि झारखंडचे माजी

राज्यपाल, न्यायमूर्ती जी.एस. सिंघवी, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि डॉ. शिव कुमार सरीन, संचालक आणि कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ लिव्हर अँड बिलिअरी सायन्सेस, नवी दिल्ली

पुरस्काराविषयी: १९९५: पासून भगवान महावीर फाउंडेशनकडून देशभरातील असामान्य व्यक्तीआणि संस्थांना अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यक, तसेच समाज व सामाजिक सेवा यांचा प्रसार करण्यातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन महावीर पुरस्कार प्रदान केले जात आहेत.

भारताचे राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती, राज्यपाल आणि केंद्रीय मंत्री यांसारख्या मान्यवरांच्या हस्तेहे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत, ज्यातून त्यांच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठा आणिमहत्त्व अधोरेखित होते. नामांकन फॉर्म www.bmfawards.org या संकेतस्थळावरून डाउनलोड करता येतील.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधावा : समता लखानी, समन्वयक, भगवान महावीर फाउंडेशन मोबाईल नंबर +९१ ९९६२३४०३६७

## थोडक्यात पण महत्वाचे...

### मराठीच्या अस्तित्वावरील चर्चेदरम्यान देवनागरी संशोधनाला राष्ट्रीय मान्यता

■ शेतकरी कुटुंबातील तरुण संशोधकाच्या टीमला भारत सरकारकडून डिझाईन नोंदणी (पेटंट); भाषा तंत्रज्ञान क्षेत्रासाठी महत्वाचे पाऊल

जेजुरी (दैनिक संध्या) : राज्यात सध्या मराठी भाषेचे जतन, मराठी शाळांची घटती संख्या, इंग्रजी माध्यमाकडे वाढता कल, अभिजात मराठीचा दर्जा आणि प्रशासनातील मराठीचा वापर या विषयांवर व्यापक चर्चा सुरू असतानाच मराठी भाषेच्या तांत्रिक भविष्यासाठी आशादायी ठरणारी एक महत्त्वाची घटना घडली आहे. देवनागरी अक्षर ओळख (Device for Devanagari Characters Recognition) या संशोधनाला भारत सरकारच्या बौद्धिक संपदा कार्यालयाकडून डिझाईन नोंदणी (Design Registration) प्राप्त झाली आहे. या संशोधनामध्ये पुरंदर तालुक्यातील साकुर्डे गावचे रहिवासी आणि जिजामाता शिक्षण संकुल जेजुरी मधील प्रा. मधुसूदन निवृत्ती जगताप यांच्यासह ११ संशोधकांच्या टीमचा सहभाग आहे. साध्या शेतकरी कुटुंबातून शिक्षणाच्या बळावर संशोधन क्षेत्रात आलेल्या प्रा. जगताप यांनी आपल्या सहकाऱ्यांसह विकसित केलेले हे संशोधन भारतीय भाषांच्या डिजिटल भविष्यासाठी उपयुक्त मानले जात आहे. देवनागरी लिपीतील अक्षरे अधिक अचूकपणे ओळखण्यासाठी विकसित करण्यात आलेले हे तंत्रज्ञान भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), दस्तऐवजांचे डिजिटायझेशन, ई-गव्हर्नन्स, शिक्षण आणि भारतीय भाषा संगणकीय प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकते. मराठीसह देवनागरी लिपीचा वापर करणाऱ्या विविध भारतीय भाषांसाठीही या संशोधनाचा उपयोग अपेक्षित आहे. मराठीच्या संवर्धनासाठी केवळ भाषिक आंदोलन नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानामध्ये मराठीला सक्षम स्थान मिळवून देणारे संशोधनही तितकेच आवश्यक असल्याचे या निमित्ताने अधोरेखित होत आहे. अशा वेळी एका मराठी संशोधकाच्या नेतृत्वाखालील टीमला मिळालेली ही राष्ट्रीय मान्यता राज्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

### वडिलोपार्जित शेत जमिनीच्या वादातून गोळीबार; मोई येथील घटना

चाकण (दैनिक संध्या) : वडिलोपार्जित शेत जमिनीच्या वादातून दोन मोटारींवर मोठमोठे दगड फेकून वाहनांची तोडफोड करण्यात आली. तसेच हातातील पिस्तुलाने एकावर गोळीबार करत त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची विचित्र घटना खेड तालुक्यातील मोई येथे शुक्रवारी (दि.२६) घडली. सुरेश विष्णू गवारी (वय ६० वर्ष, रा. मुक्ताई मंदिराजवळ मोई, ता. खेड ) यांनी प्रकरणी दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. सुरेश यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आशिष गवारी (वय २१, रा. बिजलीनगर झोपडपट्टी, चिंचवड पुणे ) व इतर चार अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोई येथे शुक्रवारी (दि.२६ ) सकाळी पावणे दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. येथील पोलिसांकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार, मोई येथे मुक्ताई मंदिराजवळ फिर्यादी सुरेश गवारी हे त्यांच्या कुटुंबासह राहतात. फिर्यादी सुरेश यांचा चुलत नातू आशिष नंदू गवारी (रा. बिजलीनगर) व त्याच्या अन्य २० ते २४ वयोगटातील चार साथीदारांनी फिर्यादी सुरेश यांच्या वडिलोपार्जित शेत जमिनीच्या कारणावरून सुरेश यांच्या घरासमोर येत त्यांच्या महिंद्रा कंपनीची एकस यु व्ही ७०० मोटार व क्रेटा मोटार यांच्यावर मोठमोठे दगड फेकून मोटारींची तोडफोड केली. आशिष गवारी यांनी त्याच्या हातातील पिस्तुलातून फिर्यादी सुरेश गवारी त्यांच्या दिशेने गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाळुंगे पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### टीईटी पेपरफुटीतील सूत्रधारांवर मकोका लावावा; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई (दैनिक संध्या) : टीईटी परीक्षेच्या पेपरफुटीची घटना अत्यंत संतापजनक असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि अत्यंत कठोर चौकशी केली जाईल. दोषी कोणत्याही पदावरील असो किंवा कोणत्याही संघटित टोळीचा भाग असो, त्याला कोणतीही सवलत दिली जाणार नाही. संबंधितांवर कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य सरकार भ्रष्टाचाराविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरणावर काम करत असून, पेपरफुटी हा प्रकार केवळ गैरव्यवहार नसून संघटित गुन्हेगारीचे स्वरूप धारण करणारा गंभीर अपराध असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पोलिसांच्या तत्पर आणि सतर्क कारवाईचे विशेष कौतुक केले. गुप्त माहितीच्या आधारे तातडीने छापे टाकून पोलिसांनी लाखो मेहनती आणि प्रामाणिक उमेदवारांचे भवितव्य अंधारात जाण्यापासून वाचवले, असे त्यांनी म्हटले. टीईटी परीक्षेला बसलेल्या सर्व उमेदवारांना आश्वस्त करताना शिंदे म्हणाले की, ही परीक्षा लवकरात लवकर पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पुन्हा घेतली जाईल. कोणत्याही प्रामाणिक उमेदवाराच्या हक्कावर गदा येऊ दिली जाणार नाही.

# ३० हजार कोटींच्या प्लास्टिक पुनर्वापर उद्योगाला नवी दिशा

## २ ते ५ जुलैदरम्यान नवी दिल्लीत 'जीसीपीआरएस २०२६'

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

२०३५ पर्यंत ६९ ह्या कोटींपर्यंत मजल मारण्याची क्षमता असलेला आणि सध्या ३० हजार कोटी रुपये मूल्य असलेला भारतातील प्लास्टिक पुनर्वापर उद्योगासाठी तिसरी ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्झिबिशन ऑन प्लास्टिक रिसायकलिंग अँड सस्टेनेबिलिटी (जीसीपीआरएस २०२६) आयोजित करण्यात येणार आहे. ही परिषद २ ते ५ जुलै २०२६ दरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे होणार असून अखिल भारतीय पातळीवरील अग्रगण्य संस्था ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (एआयपीएमए) ने हे आयोजन केले आहे. या चार दिवसीय परिषदेला रसायन व खते मंत्रालय, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, नीती आयोग तसेच गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभणार आहे.

जीसीपीआरएसचे अध्यक्ष श्री. अरविंद मेहता आणि एआयपीएमएचे अध्यक्ष श्री. सुनील शाह यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रगत धोरणे, उद्योगातील सहकार्य आणि जबाबदार संसाधन व्यवस्थापन व परिपत्र अर्थव्यवस्था या घटकांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून भारतातील शाश्वतता परिसंस्था मजबूत करण्यावर सातत्याने भर देण्यात येत आहे. आशियातील प्लास्टिक पुनर्वापर आणि शाश्वततेसाठीचे सर्वात मोठे प्रदर्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जाणाऱ्या या प्रदर्शनात १२ देशांमधील २०० हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार असून, १२,००० चौरस मीटरच्या विस्तीर्ण प्रदर्शन क्षेत्रात प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापराच्या संपूर्ण मूल्यसाखळीचे प्रतिनिधित्व केले जाणार आहे. 'जीसीपीआरएस २०२६' भारतातील प्लास्टिक पुनर्वापर क्षेत्राच्या वाढीला गती देण्यासोबतच केंद्र सरकारच्या शाश्वतता, संसाधन कार्यक्षमता, परिपत्र अर्थव्यवस्था आणि कार्बन-न्यूट्रल भविष्यासाठीच्या दृष्टिकोनाला बळकटी देणारे ठरणार आहे. हे प्रदर्शन प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी एक सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून काम करेल. यामध्ये तंत्रज्ञान पुरवठादार, पुनर्वापर करणारे उद्योग, धोरणकर्ते, ब्रँड मालक, उद्योजक, संशोधक आणि पर्यावरण तज्ज्ञ एकाच व्यासपीठावर येणार आहेत. प्रदर्शनामध्ये ग्राहकांकडून निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनातील अत्याधुनिक तंत्रज्ञानावर भर असेल. यामध्ये कचरा संकलन व वर्गीकरण प्रणाली, स्वयंचलित कचरा छाननी तंत्रज्ञान, प्रगत यांत्रिक व रासायनिक पुनर्वापर उपकरणे, कचऱ्यापासून तेल व ऊर्जा निर्मिती तंत्रज्ञान, वापरानंतरच्या कचऱ्यावरील उपाययोजना तसेच पुनर्वापरित प्लास्टिक या क्षेत्रांसाठी विशेष बाजारपेठ निर्माण करण्यावर भर असेल.

उद्योजकांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कन्सल्टंट क्लिनिक उपलब्ध असेल, तर पर्यावरण डेस्क विस्तारित उत्पादक जबाबदारी (EPR) आणि नियामक अनुपालनाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सज्ज असेल. शून्य कचरा कार्यक्रम म्हणून आयोजित करण्यात येणारे 'जीसीपीआरएस 2026' हे स्वच्छ भारत अभियानाच्या संकल्पनेशी सुसंगत असून, तंत्रज्ञानावर आधारित पुनर्वापर उपायांद्वारे प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि भारतातील परिपत्र अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा त्यामागील उद्देश आहे.



### जुन्नरमध्ये वल्लभ पतसंस्थेचे नूतनीकरण

**नारायणगाव (दै. संध्या) :**

जुन्नर शहर व परिसरातील नागरिकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने माजी आमदार वल्लभ बेनके यांच्या दूरदृष्टीतून सुरू करण्यात आलेली श्री वल्लभ नागरी सहकारी पतसंस्था सभासद, ठेवीदार व ग्राहकांच्या विश्वासाला पात्र ठरलेली असून सहकार क्षेत्रात पतसंस्थेने नावलौकिक प्राप्त केला असल्याचे गौरवोद्गार जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके यांनी काढले. जुन्नर येथे मंगळवार रोजी श्री वल्लभ नागरी सहकारी पतसंस्थेच्या मार्केट यार्ड शाखेच्या नूतनीकरण उद्घाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. वल्लभ पतसंस्थेच्या जुन्नरमधील संगणीकृत दोन्ही शाखा कार्यरत असून संस्थेची सभासद संख्या ९११८ वर पोहोचली आहे. संस्थेकडे सध्या ४० कोटींच्या ठेवी असून थकबाकीचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजेच ०.६० टक्के इतके आहे. या पतसंस्थेला ऑडिट वर्ग 'अ' मिळाला असून, ही सोने तारण करणारी एक नंबरची पतसंस्था असल्याचे परीक्षणात नमूद केले आहे.

### डेलॉईट इंडिया जीएसटी@9 सर्वेक्षण : एमएसएमईंनी जीएसटी सुधारणांना दिला पाठिंबा

*जलद परतावा आणि कार्यरत भांडवलासाठी अधिक सहाय्याची मागणी*

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आर्थिक विकास, निर्यात आणि रोजगार निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असताना, जीएसटीबाबत त्यांची धारणा केवळ अनुपालनाच्या बंधनातून बदलत जाऊन औपचारिकता आणि कार्यक्षमतेला चालना देणाऱ्या प्रणालीकडे वळली आहे. रिटर्न भरण्याची सुलभ प्रक्रिया आणि मर्यादांमध्ये (थ्रेशोल्ड) करण्यात आलेल्या शिथिलतेमुळे अनुपालन सुलभ झाले असले, तरी उद्योगांना जीएसटी सुधारणांच्या पुढील टप्प्यात तरलता वाढविणे, इनपुट टॅक्स क्रेडिट ( आयटीसी) नियम अधिक सोपे करणे आणि कार्यरत भांडवलावरील दबाव कमी करणे यांना प्राधान्य दिले जावे, अशी अपेक्षा आहे. डेलॉईट इंडिया यांच्या जीएसटी@9 सर्वेक्षण : द नेक्स्ट फेज – जीएसटी 2.0 नुसार, एमएसएमई आता केवळ जीएसटीचा अवलंब करण्यापलीकडे जाऊन त्याच्या अधिक परिणामकारक वापरावर भर देत आहेत. सर्वेक्षणातील निष्कर्षांमधून तरलता वाढविणे आणि अनुपालन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सुधारणांना मोठा पाठिंबा असल्याचे दिसून आले आहे. सर्वेक्षणातील जवळपास 89 टक्के प्रतिसादकर्त्यांनी जीएसटी परतावा आणि प्री-डिपॉझिटच्या विलंबित रकमेवर स्वयंचलित व्याज देण्यास समर्थन दिले, तर 88 टक्के प्रतिसादकर्त्यांनी इनव्हॉइस-आधारित इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) पात्रतेला पाठिंबा दर्शवला. तसेच, 87 टक्के प्रतिसादकर्त्यांनी त्रैमासिक कर भरणा यंत्रणेचे समर्थन केले. एमएसएमईंमध्ये त्रैमासिक रिटर्न भरण्याची सुविधा ही जीएसटीमधील सर्वाधिक ओळखली जाणारी सुधारणा ठरली असून, तिची ओळख 2023 मधील 12 टक्क्यांवरून 2026 मध्ये 67 टक्क्यांपर्यंत म्हणजेच पाच पटांहून अधिक वाढली आहे.

एमएसएमई परिसंस्था मजबूत करण्यामध्ये जीएसटीच्या भूमिकेबाबत बोलताना, गोकुल चौधरी, अध्यक्ष (कर), डिलॉइट साउथ एशिया म्हणाले, "भारतातील एमएसएमई देशाच्या एकूण उत्पादनात सुमारे एक-तृतीयांश आणि निर्यातीत जवळपास निम्मे योगदान देतात. देशाच्या पुरवठा साखळीच्या कार्यक्षमतेसाठी तसेच पारदर्शक आणि औपचारिक व्यावसायिक परिसंस्था निर्माण करण्यासाठी जीएसटी हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. सुधारणांच्या पुढील टप्प्यात परतावा प्रक्रिया अधिक प्रभावी करणे, इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) नियम सुलभ करणे आणि कर सवलतींचा अखंडित वापर सुनिश्चित करून कार्यक्षमता आणि तरलता वाढविण्यावर भर दिला गेला पाहिजे.

कर क्षेत्रातील स्पर्धात्मकता व्यवसायांना अधिक वेगाने विस्तार करण्यास मदत करू शकते आणि जागतिक उत्पादन व सेवा केंद्र म्हणून भारताचे स्थान अधिक मजबूत करू शकते."

### अंगणवाडीवरील धोकादायक आंब्याच्या झाडाच्या फांद्यांची छाटणी

#### निरा ग्रामपंचायतीची तातडीने कारवाई; बालकांचा जीवितधोका टळला

**नीरा (दै. संध्या) :**

दैनिक 'संध्या'मध्ये प्रकाशित झालेल्या "प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे बालकांच्या जीवाला धोका" या वृत्ताची दखल घेत निरा ग्रामपंचायत प्रशासनाने अंगणवाडी परिसरातील धोकादायक आंब्याच्या झाडाच्या फांद्यांची छाटणी करून परिसर सुरक्षित केला आहे. या कारवाईमुळे अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्या बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.

निरा येथील प्रभाग क्रमांक १ मधील अंगणवाडी केंद्रालगत असलेल्या मोठ्या आंब्याच्या झाडाच्या फांद्या इमारतीवर झुकल्या होत्या. पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे फांद्या कोसळण्याचा धोका निर्माण झाला होता. या गंभीर समस्येबाबत अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने दैनिक 'संध्या' ने यासंदर्भात सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते.




या वृत्तानंतर निरा ग्रामपंचायत तसेच सरपंच तेजश्री काकडे उपसरपंच राजेश काकडे यांनी तातडीने दखल घेत संबंधित झाडाच्या धोकादायक फांद्यांची छाटणी केली. दोन क्रेनच्या साह्याने आपण फांद्या इमारतीवर पडू न देता बाजूला काढण्यात आल्या.त्यामुळे अंगणवाडी परिसर आता सुरक्षित झाला असून पालक, अंगणवाडी सेविका आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी नागरिकांनी दैनिक 'संध्या'ने लोकहिताचा प्रश्न प्रभावीपणे मांडल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच अशाच सार्वजनिक समस्यांवर प्रशासनाने वेळेत कारवाई करून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

### काँग्रेस नेते संजय दत्त यांची हरियाणाच्या प्रभारीपदी नियुक्ती

**मुंबई (दै. संध्या) :**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार संजय दत्त यांची हरियाणाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने त्यांच्यावर ही नवी जबाबदारी सोपवली आहे. संजय दत्त हे काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव असून यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि विधान परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. हिमाचल प्रदेश व तामिळनाडूचे सहप्रभारी म्हणूनही त्यांनी याआधी काम केले आहे.



"काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गेजी, विरोधी पक्षनेते राहुल गांधीजी व वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर मोठा विश्वास व्यक्त करून ही जबाबदारी दिली त्याबद्दल मी या नेतृत्वाचा आभारी आहे. मी काँग्रेस पक्षाचा एक निष्ठावान शिपाई असून वरिष्ठांनी माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीला न्याय देण्याचा प्रयत्न करेन. हरियाणात आगामी काळात पक्ष संघटना बळकट करून काँग्रेसचे सरकार आणणे व २०२९ साली राहुल गांधीजी यांना पंतप्रधान करण्यासाठी पक्षाची ताकद वाढवण्यावर आपाला भर असेल", असे संजय दत्त यांनी म्हटले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी !

**भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्त्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती क्षेत्र हे अन्न सुरक्षा, रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते....**




**वर्षा फडके-आंधळे,**
उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

तथापि, गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाणीटंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. याच्या निराकरणासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे, यासारखेही प्रयत्न केले जात आहेत.

मात्र, आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. परिणामी, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना -२०२६' महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांचा मानसिक तणाव कमी होतो. तसेच, त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे.

तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

**शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत:**

- सिंचन सुविधांचा विस्तार
- पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
- शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
- साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
- शेतीमालाला योग्य व हमीभाव.
- शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
- कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
- हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळपिक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा (AI) वापर महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)' २०२५-२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी- विक्रीसाठी एआय आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येणार आहेत.

शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे. कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते.

राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती.

समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे.

ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सनदी लेखापालांनी दुवा बनावे : प्रा. शिंदे

पिंपरी (दैनिक संध्या) : रियल इस्टेट क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेशी, वित्तीय व्यवस्थेशी, रोजगाराशी,तसेच बांधकाम व्यवसायिक,व्यापारी, उद्योजक आणि सर्व सामान्यांच्या जीवनाशी निगडित आहे.सर्व सामान्य नागरिक स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्व पुंजी खर्च करतो.मात्र स्थावर मालमत्ता खरेदी करताना फसवणूक होण्याची शक्यता असते. ही फसणूक टाळण्यासाठी सनदी लेखापाल आर्थिक सल्लागाराची भूमिका बाजवतो. सनदी लेखापालांनी बांधकाम व्यवसायिक आणि ग्राहक यांच्यातील दुवा बनावे .असे मत विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी व्यक्त केले. 'आयसीएआय पिं.चिं शाखेच्या वतीने गदीमा नाट्यगृहात "रियल इस्टेट कायदा" या विषयावर दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. दोन दिवशीय परिषदेत सुमारे चारशे जण सहभागी झाले होते. यावेळी आयसीएआयचे सेंट्रल कौसिंल सदस्य सीए प्रीती सावला, रिजनल कौन्सिल सदस्य सीए पिंकी केडिया (ब्रँच नॉमिनी), सीए राजेश अगरवाल , सीए रेखा धामणकर, सीए अभिषेक धामणे, एएनपी ग्रुपचे अध्यक्ष श्री सुनील अडवाणी, माजी रिजनल कौन्सिल सदस्य डॉ. अशोक पगारिया, शाखेचे सर्व माजी अध्यक्ष, आयसीएआय पिंपरी चिंचवड शाखाध्यक्ष सीए महावीर अशोकलाल कोठारी, उपाध्यक्ष सीए मनोज मालपाणी, सचिव सीए सारिका चोरडिया, खजिनदार सीए धीरज बलदोटा, माजी अध्यक्ष सीए वैभव मोदी, कार्यकारी सदस्य सीए शैलेश बोरे, सीए सचिन ढेरंगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सीए अश्विन शहा यांनी महारेरा, सीए राजन व्होरा, सीए गौतम नायक, श्री आर एस सयाल, सीए वर्धमान जैन, सीए सुहास बोरा यांनी आयकर कर विषयी मार्गदर्शन केले, ॲड. भरत रायचंदनी, सीए नरेश शेठ यांनी जीएसटी संदर्भात मार्गदर्शन केले, सीए साहिल थराणी, सीए ऋषीं लोढा सहभागी झाले. अध्यक्ष सीए कोठारी म्हणाले कि, अज्ञानाच्या अंधारतून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेवून जाण्याच्या हेतूने रियल इस्टेट कायदयाच्या परिषदेला 'ज्ञान दीपेन निर्माणम" असं नाव देण्यात आले. या परिषदेचा सीए, कर सल्लागार सोबतच बिल्डर्स, ग्राहकांना देखील नक्कीच फायदा होणार आहे. सूत्रसंचालन धीरज बलदोटा यांनी तर आभार मनोज मालपाणी यांनी मानले.



### राहुल गांधी यांना ज्ञानेश्वरी भेट; आळंदी-देहू-पंढरपूर भेटीचे संदेश नवलेंकडून निमंत्रण

पिंपरी (दैनिक संध्या) : स्वर्गीय राजीव गांधी प्रतिष्ठानच्या वतीने लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त दिल्ली येथे जाऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदेश नवले यांनी राहुल गांधी यांना संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथाची इंग्रजी आवृत्ती भेट दिली. तसेच महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा आणि वारकरी संप्रदायाच्या समतेच्या, प्रेमाच्या व मानवतेच्या संदेशाचा परिचय करून देत आळंदी, देहू आणि पंढरपूर येथे भेट देण्याचे निमंत्रण दिले. संदेश नवले यांनी राहुल गांधी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांची संजीवन समाधी असून, देहू येथे संत तुकाराम महाराजांचे शिळा मंदिर आहे. तसेच पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे दर्शन घेण्यासाठी आपण महाराष्ट्रात यावे, अशी विनंती आहे. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा आत्मा असून, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत चोखामेळा यांनी भक्तीच्या माध्यमातून समाजातील विषमता, अन्याय आणि अंधश्रद्धांविरोधात जनजागृती केली. त्यांच्या समतेच्या आणि मानवतेच्या विचारांचा संदेश आजही समाजाला दिशा देत आहे, असे यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी संदेश नवले यांनी, "राहुल गांधी यांनी पुणे जिल्ह्यातील आळंदी, देहू आणि पंढरपूर येथे भेट दिल्यास काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळेल, कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल आणि पक्ष संघटन अधिक बळकट होईल," असे मत व्यक्त केले.

### मोबाईल दुकानात कोयत्याचा धाक दाखवत खंडणीची मागणाऱ्या दोघांना अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : चिंचवड येथील रामनगर परिसरातील मोबाईल दुकानात घुसून कोयत्याचा धाक दाखवत खंडणीची मागणी करणाऱ्या दोन तरुणांना पिंपरी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात खंडणी, धमकी व मालमत्तेचे नुकसान केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अजय भगवान पवार (वय ३२, रा. शाहूनगर, चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पिंपरी पोलिसांनी कल्ल्या ऊर्फ सूरज राजू जाधव (वय २७) व डीजे ऊर्फ रोहित हणुमंत मांजरेकर (वय २०, दोघेही रा. रामनगर, चिंचवड) यांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ जून रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास रामनगर, चिंचवड येथील बालाजी मोबाईल व बालाजी स्टोअर्स दुकानात आरोपींनी प्रवेश केला. त्यांनी दुकानदाराकडे कोयत्याचा धाक दाखवत १५०० रुपयांची खंडणी मागितली. मात्र दुकानदाराने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी दुकानातील काऊंटरची काच फोडून तसेच दुकानातील सामानाची तोडफोड करून नुकसान केले. यावेळी आरोपींनी हातातील कोयता फिरवत परिसरात दहशत निर्माण केली. तसेच "आम्ही इथले भाई आहोत, आमच्या नादाला लागाल तर एकेकाला खल्लास करू," अशी धमकी देत दहशतीचे वातावरण निर्माण केले. याप्रकरणी आरोपींना अटक केली असून पुढील तपास पिंपरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लोहार हे करीत आहेत.

### शेअर मार्केट, बिटकॉइनमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने 88 लाखांची फसवणूक



पिंपरी (दैनिक संध्या) : परदेशी शेअर मार्केट, स्टॉक मार्केट व बिटकॉइनमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ८८ लाख २६ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका लिंकधारकासह समृद्धी, प्रथम पटेल आणि विविध बँकांच्या २० खातेधारकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी सुरुवातीला गुंतवणुकीवर मोठा नफा दाखवून विश्वास संपादन केला. नंतर नफा काढण्यासाठी कन्व्हर्जन फी, कॅपिटल गेन टॅक्स, सेबी शुल्क, जीएसटी आदी कारणे सांगत वेळोवेळी पैसे भरायला लावले. एकूण ८८ लाख २६ हजार ३४२ रुपये उकळूनही रक्कम परत न केल्याने फसवणूक झाल्याचे उघड झाले. सायबर पोलिस तपास करीत आहेत.

# सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पेटसिटी युनिटचे लोकार्पण

**आळंदी (दै. संध्या)**



कर्करोगाची दिवसेंदिवस वाढती रूग्णसंख्या विचारात घेता या रोगाचे अचूक निदान आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्यास प्राण वाचण्यास मदत होते. रुग्णांना जवळच्या रुग्णालयात माफक, अचूक निदान तसेच अत्याधुनिक उपचार उपलब्ध होईल याद्दष्टीने राज्य शासन प्रयत्नशील आहे, पुणे विभागातील कर्करोग रुग्णालयाच्या कामाला तातडीने गती देण्यात येईल, असे आश्वासन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

आळंदी येथील इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युट येथे पेटसिटी युनिटच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार दिलीप वळसे-पाटील, बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. नितीन देवमाने, आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युटचे विश्वस्त डॉ. संजय देशमुख, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, देशात कर्करोग रोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत असून त्याच्याविरुध्द लढण्यासाठी अचूक निदान आणि योग्यप्रकारे उपचार महत्वाचे आहे. उपचार उशिरा सुरु झाल्यास रुग्णांचा वेळ आणि खर्चात वाढ होते; याच बाबीचा विचार करुन केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनेमध्ये कर्करोगावरील उपचाराचा समावेश केलेला आहे.

राज्यशासन कर्करोगा विरुद्ध लढ्यासाठी केवळ उपचारावर भर न देता प्रतिबंध आणि अचूक निदानावर विशेष लक्ष देत आहे. त्याचाच भाग म्हणून राज्यस्तरीय कर्करोग उपचार व्यवस्था सुरु करण्यात आली आहे. महाकेअर फाऊंडेशनच्या माध्यमातून कर्करोग उपचार व्यवस्था उभारण्यात येणार आहे. तसेच नागपूर येथे हायएनर्जी मेडिकल सायक्लोस्टोन प्रकल्प स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, त्यामुळे कर्करोग उपचार, निदान आणि संशोधनाला चालना मिळणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रुग्णालयाला भेट दिली असता रुग्णालय व्यवस्थापनाने अत्याधुनिक पेटसिटी मशीनकरिता निधीची मागणी केली असता, कर्करोगाचे गांभीर्य आणि रुग्णांची गैरसोय विचारात घेता त्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून या मशीनकरिता २७ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. या पेटस्कॅन मशीनच्या माध्यमातून कर्करोगाचे अचूक निदान होण्यासह डॉक्टरांना आधुनिक उपचारपद्धतीचा अवलंब करता येणार आहे. सर्वसामान्य गरजू रुग्णांना या अत्याधुनिक आरोग्य सुविधांचा लाभ होणार असून त्यांचे प्राण वाचणार आहेत. इंद्रायणी रुग्णालयाने व्यवसायिक दृष्टिकोन न ठेवता नेहमीच रुग्णांना माफक दरात आरोग्यसेवेला प्राधान्य दिले आहे. हे कार्य सामजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे, यापुढेही अशीच निरंतर रुग्णसेवा होत राहील, या कार्याला राज्य शासनाकडून सहकार्य करण्यात येईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

दिलीप वळसे पाटील म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नामुळे पेटस्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या कर्करोग रुग्णालयात आर्थिकदृष्ट्या दुर्बल, सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळत आहे, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी राहण्याची व्यवस्थेची सुविधा आवश्यक आहे, राज्य शासनासोबत सेवाभावी संस्थानी मिळून हे काम करावे, आज दिवसेदिवस कर्करोगाचे प्रमाणात वाढ होत असून कर्करोगा विरुद्ध लढण्याची आपली सामजिक जबाबदारी आहे. येत्या काळात जिल्ह्यात कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी सुसज्ज कर्करोग रुग्णालयांची उभारणी होणे गरजेचे आहे, त्याद्दष्टीने प्रयत्न करण्याचीही गरज आहे, असे वळसे पाटील म्हणाले.

आमदार बाबाजी काळे म्हणाले, सामजिक बांधिलकी जपत आळंदी येथील इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युटच्या माध्यमातून आळंदी, खेड परिसरासह विविध भागातील रुग्णांना कर्करोगावर उपचार होत आहे, यापूढेही रुग्णसेवेच्या माध्यमातून कर्करोगमुक्त परिसर होण्यास मदत होईल, असेही काळे म्हणाले. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि डॉ. देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले. श्रीमती पवार यांनी कर्करोग रुग्णालयाची पाहणी करुन येथील सर्व सुविधांची माहिती घेतली.

## किवळे-गहुंजे जोडणाऱ्या मामुर्डी सर्व्हिस रोडची दुरावस्था

**पिंपरी (दै. संध्या)**



किवळे ते गहुंजे जोडणाऱ्या मामुर्डी येथील सर्व्हिस रोडची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

काल रात्री एका दाम्पत्याची दुचाकी रस्त्यावरील खड्ड्यात आदळल्याने ते आपल्या लहान बाळासह रस्त्यावर कोसळले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी संबंधित कुटुंबाला किरकोळ दुखापती झाल्याची माहिती मिळाली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या

**अपघातांची मालिका सुरूच**

सर्व्हिस रोडवर यापूर्वीही पाच ते सहा गंभीर अपघात घडले असून काहींना आपला जीव गमवावा लागला आहे. वारंवार तक्रारी करूनही रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर नाराजी व्यक्त केली आहे. "निवडणुका आल्या की नगरसेवकांचे चेहरे बदलतात, मात्र नागरिकांच्या समस्या तशाच राहतात," अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नाही आणि अपघातांचा धोका अधिक वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी परिसरातील रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

## राज ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त निगडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**निगडी (दै. संध्या)**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १३, यमुनानगर व सेक्टर क्रमांक २२ परिसरातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमात तब्बल १२० गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येने पालकांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी केले होते. कार्यक्रमात मॉर्डन शाळेचे ज्येष्ठ मुख्याध्यापक शरद इनामदार यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी भवितव्यासाठी आवश्यक असलेल्या अभ्यासपद्धती, शिस्त आणि करिअर नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. माजी नगरसेविका अश्विनी चिखले-मराठे यांनी मोबाईलचा योग्य वापर, त्याचे फायदे-तोटे आणि डिजिटल युगातील आव्हाने याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. निगडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे भान, सामाजिक जबाबदारी आणि सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

## शिवशाही प्रतिष्ठानच्या महासदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ

**पिंपरी (दै. संध्या)**

■ युवकांना विचारांच्या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समता, स्वाभिमान, शिक्षण, सामाजिक न्याय आणि राष्ट्रनिर्माणाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, पिंपरी-चिंचवड शहरच्या वतीने महासदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. शिवशाही प्रतिष्ठान हे १८ पगड जाती, १२ बलुतेदार समाज तसेच सर्व धर्म, पंथ आणि समाजघटकांना एकत्रित घेऊन सामाजिक ऐक्य, बंधुता आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने कार्यरत आहे. समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे प्रतिष्ठान सातत्याने जनसेवा करत आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून गर्जना मदत उपक्रम, गड-किल्ले संवर्धन, गोरगरीबांना मदत, समाजसेवा, शिवकालीन इतिहास व संस्कृतीचा अभ्यास तसेच युवकांमध्ये शिवस्मृती जागवण्याचे कार्य राबविले जाते. यावेळी शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, पिंपरी-चिंचवड शहराचे शहराध्यक्ष अथर्व तावरे यांनी सांगितले की, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या विचारातून प्रेरणा घेत शिव-शंभू-शाहू-फुले-आंबेडकर-साठे यांच्या समता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्याचे कार्य शिवशाही प्रतिष्ठान करत आहे. महासदस्य नोंदणी अभियानाच्या माध्यमातून अधिकाधिक युवक व नागरिकांना या विचारांशी जोडून एक सशक्त आणि संघटित समाज निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे."

**नोंदणीसाठी**
पिंपरी-चिंचवड शहर महासदस्य नोंदणी फॉर्म :
https://docs.google.com/forms/d/1j1Y8UQg3JRrDTZLcM58bEXC-IFaeVDxALbpUxmsDlAI/viewform

## यशवंतभाऊ भोसले ५ जिल्ह्यांच्या ३ दिवसीय कामगार संपर्क दौऱ्यावर

**कर्मचारी प्रश्नांवर होणार थेट संवाद**

**पिंपरी (दै. संध्या)**



राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगारनेते यशवंतभाऊ भोसले हे शनिवार, दि. २७ जून ते सोमवार, दि. २९ जून २०२६ या कालावधीत पाच जिल्ह्यांच्या तीन दिवसीय राज्यव्यापी कर्मचारी व कामगार संपर्क दौऱ्यावर जाणार आहेत. दौंड, कुरकुंभ एमआयडीसी, पंढरपूर, सोलापूर, तुळजापूर, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी विविध बैठका, कर्मचारी मेळावे, संवाद कार्यक्रम आणि पत्रकार परिषदांचे आयोजन करण्यात आले असून संघटित तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा होणार आहे. याबाबतची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

दौऱ्याची सुरुवात शनिवारी सकाळी पिंपरी-चिंचवड येथून होणार असून दुपारी दौंड-कुरकुंभ एमआयडीसी येथे कामगार व व्यवस्थापन प्रतिनिधींची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर कर्मचारी व कामगार संपर्क मेळावा तसेच कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला जाणार असून सायंकाळी पंढरपूरकडे प्रस्थान करून तेथे मुक्काम करण्यात येणार आहे.

रविवारी सकाळी सोलापूर येथील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सभागृहात राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या कार्यकारिणीची बैठक व कर्मचारी मेळावा होणार आहे. त्यानंतर तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन देवस्थानातील कर्मचारी व अधिकारी यांच्यासमवेत सहाय्यक कामगार आयुक्त, लातूर यांच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रलंबित कर्मचारी प्रश्नांवर बैठक होणार आहे. यानंतर टाटा इन्स्टिट्यूट, तुळजापूर येथील कर्मचारी समितीसोबत चर्चा करण्यात येईल. सायंकाळी लातूर येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील कर्मचारी कार्यकारिणी समितीची बैठक झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगरकडे प्रस्थान करण्यात येणार आहे. दौऱ्याच्या अंतिम दिवशी, सोमवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात संघटनेच्या विधीतज्ज्ञ व अधिवक्त्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. दुपारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली असून सायंकाळी सिडको येथील ललित कला भवन येथे राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या सभासदांचा भव्य कर्मचारी मेळावा होणार आहे. त्यानंतर रात्री पुण्याकडे प्रस्थान करण्यात येणार आहे.


या तीन दिवसीय दौऱ्यात यशवंतभाऊ भोसले विविध औद्योगिक क्षेत्रांतील कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, कामगार, संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. तसेच प्रलंबित कामगार प्रश्नांवर कायदेशीर मार्गदर्शन, संघटनेची पुढील भूमिका, न्यायालयीन प्रक्रिया आणि कामगारांच्या हक्कांबाबत सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

राष्ट्रीय श्रमिक आघाडीने अन्यायग्रस्त संघटित व असंघटित कामगार, कर्मचारी तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन केले आहे. या दौऱ्यामुळे राज्यातील विविध भागांतील कामगारांना त्यांच्या प्रश्नांवर थेट नेतृत्वाशी संवाद साधण्याची आणि योग्य कायदेशीर तसेच संघटनात्मक मार्गदर्शन मिळविण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

# ७० अनधिकृत होर्डिंग्जवर 'पीएमआरडीए'चा हातोडा

**पालखी मार्ग अनधिकृत होर्डिंग्जमुक्त**

**पिंपरी (दै. संध्या)**





संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या जुलै महिन्यातील आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मोठी धडक कारवाई केली आहे. 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील पालखी मार्ग आता अनधिकृत होर्डिंग्जपासून पूर्णपणे मुक्त करण्यात येत असून, आतापर्यंत ७० अनधिकृत होर्डिंग्जवर अनधिकृत बांधकाम विभागाने हातोडा चालवून ती भुईसपाट केली आहेत.

पालखी सोहळा निर्विघ्न पार पडावा, आणि वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा, या उद्देशाने 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त के. मंजूलक्ष्मी यांनी मे महिन्यातच या मार्गांवरील होर्डिंग्जचे सर्वेक्षण करून अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. या आदेशानुसार अनधिकृत बांधकाम विभागाने 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील हवेली, दौंड आणि पुरंदर तालुक्यांतील पालखी मार्गांवरील सुमारे १२३ होर्डिंग्जचे सविस्तर सर्वेक्षण केले.

या सर्वेक्षणानंतर कायदेशीर बाबींची पूर्तता न करता बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेली तब्बल ७० अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात आल्याची माहिती अनधिकृत बांधकाम विभागाचे सहआयुक्त हिंमत खराडे यांनी दिली. यामध्ये हवेली-सोलापूर रस्त्यावरील ३२, दौंड तालुक्यातील १३, पुरंदर तालुक्यातील १३ आणि वडकी येथील १२ अशा एकूण ७० अनधिकृत होर्डिंग्जवर प्रशासनाने थेट हातोडा चालवून ती भुईसपाट केली आहेत. तसेच, काही अनधिकृत होर्डिंगधारकांनी आपली होर्डिंग्ज स्वतःहून काढून घेतली आहेत.

'पीएमआरडीए'च्या हद्दीत कुठेही होर्डिंग्ज उभारताना प्रशासनाची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. नियमबाह्य आणि विनापरवाना उभारलेल्या होर्डिंग्जवर कोणतीही गय न करता थेट निष्कासनाची कारवाई केली जाईल.
– डॉ. अभिजित चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री सोमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या सचिव पदी सचिन भांडवलकर यांची निवड

सोमेश्वरनगर (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील करंजे देऊळवाडी येथील श्री सोमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या सचिव पदी सचिन सतीश भांडवलकर यांची गुरुवार दि २५ रोजी देवस्थान ट्रस्ट ऑफिसमध्ये निवड करण्यात आली. अगोदरचे सचिव विपुल विलास भांडवलकर यांनी स्व इच्छेने राजीनामा दिल्याने व सचिव पदासाठी सचिन सतीश भांडवलकर यांचा एकमेव अर्ज आल्याने ही निवड झाली.अध्यक्षस्थानी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत मोकाशी होते.याप्रसंगी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत वामन मोकाशी,विद्यमान विश्वस्त विपुल विलास भांडवलकर,मोहन मुरलीधर भांडवलकर,प्रताप मारुती भांडवलकर,अक्षय बाळासाहेब भांडवलकर,प्रदीप बबन भांडवलकर,राजेंद्र अरुणराव भांडवलकर,संतोष पंढरीनाथ भांडवलकर,सुनील बबन भांडवलकर,रामदास बबन भांडवलकर आदी मान्यवर उपस्थित होते.



### सौ. कमळाबाई कामठे यांचे निधन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : पूर्व हवेली तालुक्यातील वाडेबोल्हाई येथील आदर्श जेष्ठ माता सौ.कमळाबाई मारुती कामठे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. वाडेबोल्हाई ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विद्याधर गावडे यांच्या आत्या आहे तर कोरेगावमुळ सोसायटीचे माजी चेअरमन संजय भोसले यांच्या मावशी आहे.




### वाढदिवसाचा खर्च टाळून मुर्टी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

मुर्टी (बारामती) (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील मुर्टी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात सामाजिक कार्यकर्ते अरुण जाधव व पत्रकार शरद भगत यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा खर्च टाळून मित्र परिवारांच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. मुर्टी शाळेतील गरीब,गरजू व हुशार विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश करून त्यांना शालेय साहित्य देण्यात आले. शरद भगत यांचा विविध सामाजिक कामात पुढाकार असतो तसेच वेगवेगळ्या प्रश्नांना वाचा फोडून ते सामाजिक काम करत असतात. शरद भगत हे गरीब परिस्थितीतून आले असल्यामुळे त्यांना त्याची जाणीव आहे व त्यामुळेच ते असे समाजाभिमुख उपक्रम राबवीत आहेत. त्यांना या चांगल्या कामात पत्रकार मित्रांचे सहकार्य मिळत आहे.शिक्षणापासून गोरगरीब मुले वंचित राहू नयेत यासाठीच हा उपक्रम राबवत असून यापुढेही असेच चांगले उपक्रम राबवू असेही यावेळी शरद भगत यांनी सांगितले. गरजू व परिस्थितीने गांजलेल्या विद्यार्थ्यांनाही शिक्षणाचा आनंद घेता यावा,त्यांना लागणाऱ्या वस्तू वेळेत मिळाव्यात.कौटुंबिक परिस्थिती अभावी शिक्षणात अडथळा येऊ नये अशी आपल्या (अक्षय) मुलाची इच्छा होती.ती इच्छा पूर्ण करण्यासाठी आपण या मुलांना शैक्षणिक साहित्य देत असल्याचे अरुण जाधव यांनी सांगितले.यावेळी भालचंद्र महाडिक यांच्याकडून उपस्थित मान्यवर,ग्रामस्थ,शिक्षक व पत्रकार यांना संविधान उद्देशिका प्रत देण्यात आली.यावेळी कार्यक्रमास मुर्टी येथील तानाजी राजपुरे,छबन राजपुरे,भारतीय पत्रकार संघाचे पुणे जिल्हा सचिव काशिनाथ पिंगळे, भालचंद्र महाडिक,निखिल नाटकर, विजय लकडे,अजय पिसाळ,सीमा चोपडे,मोहम्मद शेख,दिनेश राजपुरे,शेखर गोरे,अक्षय साळुंखे तसेच महाविद्यालयाचे मुख्याध्यापक,सर्व शिक्षक-शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मातीचे संवर्धन, शाश्वत शेती आणि समृद्ध भविष्यासाठी शेत वाचवा अभियान महत्त्वाचे

माळेगाव (दैनिक संध्या) : "मातीचे आरोग्य जपणे, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने भारत सरकारच्या कृषि मंत्रालय अंतर्गत भारतीय कृषि संशोधण परिषद नवी दिल्ली या संस्थेसह देशातील कृषि विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्रे, राज्य सरकारचा कृषि विभाग आणि कृषि विद्यापीठा मार्फत 'शेत वाचवा अभियान' राबविले जात आहे, त्या उपक्रमाला सर्वत्र शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे," अशी माहिती केंद्रीय कृषी तथा शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी बारामतीत दिली. केंद्रीय राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी आज शनिवारी राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था माळेगाव, तसेच अँग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट - बारामती या संस्थेच्या विविध संशोधनात्मक उपक्रमांची पाहणी केली. यावेळी ते अँग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट येथील शेतकरी मेळाव्यात बोलत होते. शेतकरीहितासाठी राबविण्यात येणाऱ्या संशोधन कार्याचे कौतुक करीत मंत्री श्री. ठाकूर यांनी येथील संस्था प्रशासनाच्या पदाधिकाऱ्यांसह वैज्ञानिकांना प्रोत्साहित केले.

# प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीला नवे बळ

**कर्मवीर शिक्षण संस्थेकडून जाहीर पाठिंबा**

इंदापूर (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य श्री. नंदकुमार सागर यांनी आज कर्मवीर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अमरसिंह (आप्पा) पाटील आणि उपाध्यक्ष श्री. उदयसिंह (नाना) पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी घोंगडी व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा पारंपरिक पद्धतीने सन्मान करण्यात आला. तसेच पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार असलेल्या प्राचार्य नंदकुमार सागर यांना अध्यक्ष व उपाध्यक्षांनी जाहीर पाठिंबा देत त्यांच्या उमेदवारीला भक्कम बळ दिले.

सन्मानाला उत्तर देताना प्राचार्य नंदकुमार सागर म्हणाले, "भाऊंच्या पवित्र प्रतिमेला विनम्र अभिवादन करून मी हा सन्मान स्वीकारत आहे. भाऊंनी शिक्षण, समाजकारण आणि माणुसकीचा जो आदर्श निर्माण केला, तोच वारसा आप्पा आणि नाना अत्यंत निष्ठेने पुढे नेत आहेत. त्यांच्या कार्याला बाबीर देवाचे आशीर्वाद लाभोत, हीच माझी प्रार्थना आहे."

ते पुढे म्हणाले, "हा सन्मान माझा वैयक्तिक नसून राज्यातील



प्रत्येक मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षणप्रेमीचा आहे. आप्पा आणि नाना यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास व व्यक्त केलेला जाहीर पाठिंबा ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षण संस्थांच्या न्याय्य प्रश्नांसाठी मी अधिक जोमाने व प्रामाणिकपणे कार्य करत राहीन."

भावनिक शब्दांत त्यांनी पुढे सांगितले, "'आभार' हा शब्द मी वापरणार नाही, कारण आपले नाते हे औपचारिक नसून विश्वास, आत्मीयता आणि माणुसकीच्या बंधांनी जोडलेले आहे. शिक्षण, समाजहित आणि शिक्षकांच्या हक्कांसाठी आपण भविष्यातही खांद्याला खांदा लावून कार्य करू."

या भेटीदरम्यान शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न, मुख्याध्यापक व शिक्षकांच्या अडचणी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक उपाययोजना तसेच पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सविस्तर चर्चा झाली. शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी संघटितपणे काम करण्याची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

कर्मवीर शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांनी व्यक्त केलेला जाहीर पाठिंबा आणि प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या नेतृत्वावरील विश्वासामुळे पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील त्यांच्या उमेदवारीला आणखी बळ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी इंदापूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा कर्मवीर शिक्षण संस्थेच्या श्री बाबीर विद्यालय, रुई येथील मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ पाटील, जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जेजुरी तालुका पुरंदर या विद्यालयाचे पर्यावरण विभाग प्रमुख राघू हारूळे उपस्थित होते.

## पुरंदर कनिष्ठ महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम संपन्न



पुरंदर (दै. संध्या)

उच्च न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे तालुका विधी सेवा प्राधिकरण सासवड दिवाणी व फौजदारी न्यायालय यांनी आंतरराष्ट्रीय अमली पदार्थाचा दुरुपयोग व अवैद्य तस्करी विरोधी जनजागृती करण्यासाठी पुरंदर कनिष्ठ महाविद्यालय सासवड येथे नुकतेच मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सासवड न्यायालयाचे सहन्यायाधीश सतीश शिंदे, सासवड बार असोसिएशनचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य आदी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.दीपप्रज्वलानानंतर सासवड बारच्या उपाध्यक्ष ॲड. सरला तिवारी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. यावेळी अमली पदार्थांचा दुरुपयोग व अवैध तस्करी या विषयावर ॲड. परेश इभाड यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. तर सायबर क्राईम या विषयावर ॲड. संतोषी निगडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याबाबत तसेच सोशल मीडियाचा सुरक्षित वापर करण्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.

## वरवंड तलावात पंधरा दिवसाचा पाण्याचा साठा

**अनेक जल योजना बंद होण्याच्या दिशेने**

दौंड (दै. संध्या)



दौंड तालुक्यातील वरवंड हेक्टोरे तलावात आईन पाऊस काळात जुलै महिन्यामध्ये पाण्याची पातळी खोलवर गेली असून तळ्यामध्ये सुमारे पंधरा दिवसाचा पाण्याचा साठा उपलब्ध असून अनेक गावातील जल योजना बंद पडणार असल्याचे दिसून येत आहे जुलै महिन्यामध्ये दौंड तालुक्यामध्ये पावसाने दडी मारल्यामुळे पाण्याचा दुष्काळ दिसून येत आहे प्रत्येक जण आपल्या गावाला पाणी मिळण्यासाठी गाव जल योजना प्रकल्प चालण्यासाठी पोकलेन व जेसीबीच्या साह्याने खोदकाम सुरू केले आहे जर पाऊस वेळेवर न झाल्याने दौंड तालुक्यातील जनतेला दुष्काळाशी सामना करावा लागेल असे चित्र वरवंड व्हिक्टोरिया या तळ्यावरती दिसत आहे साहजिकच अनेक शेतकऱ्यांची पंपाची वीज खंडित करून दौंड तालुक्यातील गावातील जल योजना पाणीपुरवठा सुरळीत चालण्यासाठी महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग यांच्या वतीने तरतूद करण्याचे काम सुरू आहे. सर्व गावातील नागरिकांनी व कंपनी धारकांनी पाण्याचा जपून वापर करावा असे महाराष्ट्र शासन जल योजना अधिकारी यांनी आव्हान केले आहे शेतकऱ्यांची उभे पिके पाने वाचून जळत असलेली दिसत आहेत शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे व नाराजगी पाहायला मिळत आहे

दौंड तालुक्यातील वरवंड हेक्टोरे तलावात आईन पाऊस काळात जुलै महिन्यामध्ये पाण्याची पातळी खोलवर गेली असून तळ्यामध्ये सुमारे पंधरा दिवसाचा पाण्याचा साठा उपलब्ध असून अनेक गावातील जल योजना बंद पडणार असल्याचे दिसून येत आहे .

जुलै महिन्यामध्ये दौंड तालुक्यामध्ये पावसाने दडी मारल्यामुळे पाण्याचा दुष्काळ दिसून येत आहे प्रत्येक जण आपल्या गावाला पाणी मिळण्यासाठी गाव जल योजना प्रकल्प चालण्यासाठी पोकलेन व जेसीबीच्या साह्याने खोदकाम सुरू केले आहे जर पाऊस वेळेवर न झाल्याने दौंड तालुक्यातील जनतेला दुष्काळाशी सामना करावा लागेल असे चित्र वरवंड व्हिक्टोरिया या तळ्यावरती दिसत आहे.

साहजिकच अनेक शेतकऱ्यांची पंपाची वीज खंडित करून दौंड तालुक्यातील गावातील जल योजना पाणीपुरवठा सुरळीत चालण्यासाठी महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग यांच्या वतीने तरतूद करण्याचे काम सुरू आहे सर्व गावातील नागरिकांनी व कंपनी धारकांनी पाण्याचा जपून वापर करावा असे महाराष्ट्र शासन जल योजना अधिकारी यांनी आव्हान केले आहे शेतकऱ्यांची उभे पिके पाने वाचून जळत असलेली दिसत आहेत शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे व नाराजगी पाहायला मिळत आहे.

## ठाणे पोलीस आयुक्तालयाची धडक कारवाई

**तब्बल ३९ कोटींचा ६०० किलो अंमली पदार्थांचा साठा जप्त करून केला नष्ट!**

भिवंडी (दै. संध्या)

संपूर्ण देशभरात अमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचवण्यासाठी 'नशामुक्त भारत अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबवले जात आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून, जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून ठाणे पोलीस आयुक्तालयाने ड्रग्ज माफियांच्या विरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई केली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये वेगवेगळ्या कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल ३९ कोटी ३ लाख ४८ हजार ४०० रुपये किमतीचा आणि सुमारे ६०० किलो वजनाचा अंमली पदार्थांचा प्रचंड साठा पोलिसांनी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून पूर्णपणे नष्ट केला आहे. ठाणे शहराचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या थेट आदेशानंतर ही मोठी मोहीम राबवून सर्व अंमली पदार्थ नवी मुंबईतील तळोजा एम.आय.डी.सी. येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीत नेऊन शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आले, ज्यामुळे अमली पदार्थ




तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

वकेंद्र सरकारच्या कायदेशीर निर्देशानुसार आणि अंमली पदार्थ विरोधी मोहिमेला गती देण्यासाठी ठाणे पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे. २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ दिनाचे औचित्य साधून केंद्रीय मुद्देमाल नाश समितीचे अध्यक्ष तथा पोलीस सह आयुक्त (गुन्हे) डॉ. पंजाबराव उगले, समितीचे सदस्य तथा पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय १) मीना मकवाना आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विनय घोरपडे यांच्या मुख्य उपस्थितीत ही नष्टीकरण मोहीम पार पडली. ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत दाखल असलेल्या एकूण ११२ गंभीर गुन्ह्यांमध्ये हा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे व त्यांच्या विशेष पथकाने सर्व आवश्यक त्या कायदेशीर सोपस्कार आणि तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून या कोट्यवधींच्या ड्रग्जची होळी केली. वया धडक कारवाईत नष्ट करण्यात आलेल्या अंमली पदार्थांच्या अचूक आकडेवारीवर नजर टाकल्यास पोलिसांच्या कामगिरीची व्याप्ती स्पष्ट होते. पोलिसांनी ६६ गुन्ह्यांशी संबंधित ५६४ किलो ६७४ ग्रॅम वजनाचा गांजा नष्ट केला, ज्याची बाजारभावाप्रमाणे किंमत १ कोटी १३ लाख ५ हजार रुपये होती. तसेच केवळ २ गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला ८५ लाख ५० हजार रुपयांचा ८५५ ग्रॅम वजनाचा अत्यंत महागडा हायब्रिड गांजाही खाक करण्यात आला. सर्वात मोठी कारवाई एम.डी. (मेफेड्रोन) या जीवघेण्या अंमली पदार्थावर झाली, ज्यामध्ये २९ गुन्ह्यांतर्गत जप्त केलेले १३ कोटी ४३ लाख रुपये किमतीचे ६ किलो ७१५ ग्रॅम एम.डी. नष्ट करण्यात आले. याशिवाय ७ गुन्ह्यांमधील २० कोटी ९८ लाख २० हजार रुपये मूल्य असलेले २० किलो ९८२ ग्रॅम चरस, ७ गुन्ह्यांमधील २ लाख ९३ हजार ४०० रुपये किमतीच्या १४६७ कफ सिरपच्या बॉटल्स आणि १ गुन्ह्यातील २० लाख ८० हजार रुपयांची १०४ ग्रॅम ब्राउन शुगर अशा प्रकारे एकूण ५९४ किलो ३३२ ग्रॅम वजनाचा ठोस साठा आणि १४६७ कफ सिरपच्या बाटल्या असा एकूण ३९ कोटींपेक्षा जास्त रुपयांचा मुद्देमाल एकाच वेळी नष्ट करण्यात आला आहे. ही अत्यंत संवेदनशील आणि मोठी कामगिरी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पूर्ण झाली.

## अल्पवयीन मुलांना दुचाकी दिल्यास पालकांवर होणार गुन्हा दाखल

बारामती (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यांतर्गत कठीण पूल, कोऱ्हाळे, वडगाव निंबाळकर, सोमेश्वरनगर, वाकी, चोपडज, पळशी, मुर्टी, मुरूम, वानेवाडी या परिसरात शाळा-महाविद्यालये आहेत. सोमेश्वरनगर हे ग्रामीण भागातील मुख्य बाजारपेठसह मोठे शिक्षण संकुल असल्याकारणाने विद्यार्थी संख्या जास्त आहे. पालकांनी आपल्या अल्पवयीन शिकत असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना दुचाकी वाहन देऊ नये व त्यांना वाहन दिल्यास त्यांच्या पालकांवरती गुन्हे दाखल केले जातील असे वडगांव निंबाळकर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांनी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे घेतलेल्या पत्रकार परिषद सांगितले.तसेच जड वाहतूक करणारी वाहने चालवत असताना त्यांनी आपल्या वाहनांचा वेग मार्गावर आलेल्या प्रत्येक गावामध्ये वाहतुक विभागाने दिलेल्या नियमांचे पालन करत ठेवावा.गाड्यांना



**तसेच ११२ वर फसवे कॉल करणेही पडणार महागात - जीवन मोहिते (प्रभारी पोलीस निरीक्षक)**

असलेले ब्लॅक फिल्मिंग,फॅन्सी नंबर प्लेट बसणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.त्याचप्रमाणे ११२ वर चुकीचे,फसवे कॉल करू नये असेही मोहिते यांनी बोलताना सांगितले.

**वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत कोणत्याही गैरप्रकाराबाबत ११२ वर चुकीचा कॉल, अल्पवयीन मुलांना दुचाकी देणे, अवैद्य धंदे खपवून घेतले जाणार नाही - जीवन मोहिते (प्रभारी पोलीस निरीक्षक )**

# मतदार याद्यांचे पुर्ननिरीक्षण मोहीम ३०जून ते २९ जुलै पासून राबविण्यात येणार

राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड आळंदी विधानसभा मतदार संघातील मतदार याद्यांचे सखोल पुर्ननिरीक्षण करुन मतदार याद्या अचुक व पारदर्शी बनविण्यासाठी येत्या ३० जुन ते २९ जुलैपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेंतर्गत मतकेंद्रानिहाय अधिकारी (बी.एल.ओ) घरोघरी जाऊन मतदारांनाची अचूक माहिती घेणार असल्याचे मतदान नोंदणी अधिकारी तथा प्रांत अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी सांगितले. खेड तालुक्यातील सर्व मतदाराकडुन अर्जद्वारे अचूक माहिती भरुन घेण्यासाठी ३७ पर्यवेक्षक आणि १७ निरीक्षक आणि ३८९ बीएलओ यांना दोन टप्यात खेड बाजार समितीच्या सभागृहात प्रशिक्षना सह मार्गदर्शन करण्यात आले. मतदान केंद्रनिहाय नेमण्यात आलेले बीएलओ घरोघरी जाऊन विधानसभा मतदार संघातील मतदार नोंदणी अर्ज भरुन घेणार असुन मतदारांना स्वतः चे आयकार्ड साईज फोटो जवळ ठेवणे. सोबत माहिती भरण्याकरीता मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, मोबाईल नंबर, आदि माहिती जवळ ठेवण्याचे आवाहन महसुल प्रशासनाच्या वतीने मतदान नोंदणी अधिकारी तथा प्रांत अनिल दौंडे यांनी केले आहे.

निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार खेड तालुक्यातील सर्व मतदारांच्या घरोघरी मंगळवार २९ जुनपासुन बीएलओ स्वतः भेटी देऊन देण्यात येणाऱ्या अर्जावर मतदारांचे फोटो आणि नाव, गावाचे नाव, मतदान केंद्र असे माहितीचा छापील अर्जावर मतदारांनी आपली माहिती अचुक भरुन देणे आवश्यक आहे. देण्यात येणाऱ्या दोन अर्जापैकी एक अर्ज मतदारांनी स्वतः कडे ठेवणे. तर दुसरा अर्ज बीएलओ कडे देणे. एखाद्या मतदाराला आपला फोटो जुना वाटत. चेहरा ओळखत नाही अशा मतदारांनी अलिकडे काढलेला फोटो अर्जावर चिटकवण्याची संधी निवडणूक आयोगाने दिली आहे

खेड तालुक्यातील ३८९ मतदान केंद्रावर ३८९ बुथ लेव्हल ऑफीसर यांना मतदान केंद्रनिहाय मतदार यादीनुसार मतदारांचे दोन छापील अर्जाचे वाटप करण्यात आले असुन येत्या मंगळवार दि. २९ जुन पासुन मतदान केंद्रातंर्गत येणाऱ्या मतदारांच्या घरी जाऊन कुंटुबातील सर्व मतदारांचे अर्ज वाटप करुन जागेवरच माहिती भरुन घेणार आहे. कुटुंबातील मतदार जर बाहेरगावी कामधंदा नोकरी निमित्ताने वास्तव्य करुन असेल तर अशा मतदारांची सर्व माहिती घेऊन मतदार यादीत इथे नाव ठेवायचे का तिकडे ठेवणार अशी माहिती संपर्क करुन विचारल्यानंतर बीएलओ निर्णय घेऊन याची मतदार यादी मँपिगद्वारे फेरपडताळणी करुन अन्य ठिकाणचे नाव दुबार समजुन वगळण्यात येणार असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, महसुल नायब तहसीलदार राम बीजे यांनी दिली.

निवडणुक आयोगाने गेल्या दोन महिन्यात दुबार मतदार नावाचा मँपिग द्वारे शोधमोहीम राबवल्याने आता संपुर्ण देशभरातील एकाच मतदार संघातील मतदान केंद्रावर मतदारांची दुबार नावे कमी होणार आहे. नगरपंचायत नगरपरिषद , नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीलगतची गावामधील ग्रामपंचायत हद्दीतील अनेक मतदारांची नावे घुसवुन बोगस होणाऱ्या मतदानाचा होणारा खेळ संपुष्टात येण्यास मदत होणार आहे. तर ग्रामीण भागातील अनेक नोकरचाकरमानी , कामधंद्यानिमित्त शहरात वास्तव्यास अथवा कायमस्वरुपी स्थायिक झाले असतात तेथेही मतदार यादीत नाव आणि मुळगावच्या ग्रामपंचायतीच्या मतदार यादीत नावे असतात. आजही ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अनेक गावातील मुंबईत वास्तव्यास असणाऱ्या मतदारांना बसेस, वहाने करुन आणुन मतदान करुन घेतले जाते तर पश्चिम आदिवासी भागातील काही ग्रामपंचायतीचे सरपंच, मुंबईत वास्त्याव्यास असुन गावचा कारभार करताना पहावयास मिळत आहे. ही वस्तुस्थिती अनेक गावातील युवकांना खटकत असते. मात्र आता निवडणुक आयोगाने याबाबत मतदार याद्या पुर्ननिरीक्षणाची मोहिम काटेकोर पणे राबविण्याचे धोरण अवलंबिले असुन घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी होणार असुन आता दुबार मतदारांना याचा दणका बसणार आहे. एकतर खेड तालुक्यातील मतदान केंद्रातील मतदार यादीत नाव नोंदवायचे की नोकरीनिमित्त वास्तव्याची ठिकाणी नाव ठेवायचे हे आता बीएलओ संपर्क करुन विचारणा करणार संबंधित मतदाराचा संपुर्ण पत्ता घेऊन मँपिगद्वारे याची पडताळणी करणे सोपे जाणार आहे. त्यामुळे अद्यायावत मतदार याद्या बनविण्यासाठी निवडणुक आयोगाने कठोर पावले उचलल्यामुळे मतदारांचा बोगस मतदानाचा होणारा घोळ बऱ्याच अंशी निकाली निघणार आहे.

**७६.८६ टक्के मॅपिंग पूर्ण**

तालुक्यात गेल्या तीन महिन्यात मतदार याद्यांचे ग्रामसेवक, तलाठी, बीएलओ मार्फत घरोघरी भेटी देऊन मतदान केंद्रानिहाय मतदार यादीतील २००२ आणि २०२४ मधील मतदार यादीनुसार पडताळणीमध्ये एकुण ३ लाख ७८ हजार ७१३ मतदारापैकी २ लाख ९१ हजार ८० मतदारांचे मँपिंगचे ७६. ८६ टक्के काम पुर्ण करण्यात आले. तर ८७ हजार ६३३ मतदारांचे मँपिंग करणे बाकी आहे. यामध्ये १९६७ नावे दुबार आढळुन आली तर ५७३२ मतदार मयत असल्याचे समोर आल्याची माहिती प्रभारी निवडणुक नायब तहसीलदार मनिषा खैरे यांनी दिली.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### ७.६९ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ ची २७ जुलै रोजी परतफेड

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या 7.69 % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, 2026 अदत्त शिल्लक रकमेची दि.26 जुलै 2026 पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि.27 जुलै 2026 रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे. 'परक्राम्य संलेख अधिनियम, 1881' अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. 27 जुलै 2026 पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही. सरकारी प्रतिभूती विनियम, 2007 च्या उप-विनियम 24 (2) व 24 (3) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबंधित तपशिलांसह प्रदानादेशाद्वारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

### ऑपरेशन टायगरनंतर आता ऑपरेशन तुतारी?

मुंबई (दैनिक संध्या) : शिवसेना ठाकरे गटात मोठी फूट पडली आहे, शिवसेना ठाकरे गटाच्या 9 पैकी 6 खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. हा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. आता शिवसेना ठाकरे गटाकडे फक्त तीनच खासदार आहेत. तर शिवसेना शिंदे गटातील खासदारांची संख्या वाढून ती 13 वर पोहोचली आहे. दरम्यान खासदार फुटीनंतर आता उद्धव ठाकरे यांनी मोठा निर्णय घेतला आहे, जिथे-जिथे बंडखोरी झाली त्या -त्या प्रत्येक मतदारसंघात जाऊन ते सभा घेणार आहेत. एकीकडे राज्यात ऑपरेशन टायगर यशस्वी झालं, या सर्व सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. दरम्यान त्यानंतर आता राज्यात ऑपरेशन तुतारीची चर्चा सुरू झाली आहे.

### राजकीय स्पर्धक बनलेला त्यांचा खास मित्र बोलला

मुंबई (दैनिक संध्या) : मागच्या आठड्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत बंड झालं. चार वर्षात दुसऱ्यांदा जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी फुटले. 2022 साली 40 आमदारांनी ठाकरेंची साथ सोडून भाजप सोबत सरकार बनवलेलं. आता निवडून आलेल्या 9 पैकी 6 खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. दोन वर्षांपूर्वी हे खासदार निवडून आले होते. नजीक कुठल्या निवडणुकाही नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महापालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका याच्या निवडणुकाही पार पडल्या होत्या. त्यामुळे खासदार फुटण्यासाठी सुद्धा काही कारण नव्हतं, तरीही ठाकरे गटाचे सहा खासदार फुटले. त्यांनी वेगळा गट स्थापन केला. यात फुटलेल्या खासदारांमध्ये सर्वाधिक चर्चा कोणाची झाली, तर ते ओमराजे निंबाळकर आहेत. ओमराजे निंबाळकर यांनी ठाकरे गटाची साथ सोडणं हा उद्धव ठाकरेंपासून सर्वसामान्य शिवसैनिकांसाठी सुद्धा मोठा झटका आहे. ओमराजे असं वागतील असं वाटलं नव्हतं, असं सुद्धा अनेक शिवसैनिकांनी बोलून दाखवलं. कारण ओमराजे निंबाळकर हा संवेदनशील नेता म्हणून ओळखला जातो. मागच्यावर्षी मराठवाड्यात पूर आला, तेव्हा सर्वसामान्यांसाठी पुराच्या पाण्यात उतरलेला हा नेता. चारवर्षांपूर्वी शिवसेनेत मोठं बंड झालं. उद्धव ठाकरे अडचणीत असतानाही ओमराजे निंबाळकर उद्धव ठाकरेंसोबत ठाम राहिले.

# ५२ आदिवासी कुटुंबांसाठीच्या गृहसंकुलाचे लोकार्पण

**रासे गृहसंकुल प्रकल्पामुळे आदिवासी कुटुंबांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा मार्ग सुकर-उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

■ पुणे (दै. संध्या)

जिल्हा परिषदेच्यावतीने उभारण्यात आलेल्या रासे येथील गृहसंकुल प्रकल्पाच्या माध्यमातून ठाकर समाजातील कुटुंबाला आधुनिक आणि सुरक्षित हक्काचे घर मिळत असल्याने हा प्रकल्प नागरिकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा प्रकल्प आहे, या कुटुंबाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा मार्ग मिळाला आहे, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. पुणे जिल्हा परिषद, पंचायत राज संस्था, ग्रामपंचायत रासे, हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी इंडिया आणि सिटी बँकेच्या सामजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून खेड तालुक्यातील रासे (ठाकरवाडी) येथे आदिवासी समाजासाठी उभारण्यात आलेल्या ५२ गृहसंकुलांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच वाडा ते साकुर्डी दरम्यान प्रवासी बोट सेवेचे दूरदृश्यप्रणालीद्वारे



लोकार्पणही करण्यात आले. यावेळी आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, बांधकाम सभापती दिपाली हुलावळे, पंचायत समिती सभापती विद्या मोहिते, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, प्रकल्प संचालक विकास खरात, उप कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी इंडियाचे शीला कृपालानी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, घर हे प्रत्येक माणसाचे स्वप्न असते. कोणत्याही कठीण प्रसंगात आपल्या हक्काच्या घरात जाण्याची ओढ लागलेली असते आणि तेच माणसाला जगण्याला बळ देत असते. रासे येथील पूर्वीच्या घराची अवस्था अतिशय बिकट होती, हालाखीच्या परिस्थितीत संघर्षमय जीवन जगत होते. आपल्या पाल्याच्या भविष्याची चिंता होती. आज ठाकर समाजातील ५२ कुटुंबाचा हक्काचे आणि संघर्षाची प्रतीक्षा संपलेली आहे. त्यामुळे आजचा क्षण हा त्यांच्यासाठी अतिशय आनंद, समाधान आणि भावनिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. त्या पुढे म्हणाल्या, या गृहसंकुलात सोलर पॅनलच्या माध्यातून वीज, शौचालय, पाणी व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून नागरिकांच्या मागणीप्रमाणे विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, भूमिहीन कुटुंबांना हक्काच्या घरासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाने केलेले प्रयत्न कौतूकास्पद आहे, असेही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या. खेड तालुक्याची जलपर्यटन, उद्योग, शेती आणि जलसमृद्ध वारसामुळे राज्यभर ओळख आहे. भीमाशंकर चासकमान परिसरात पुनश्च सुरु करण्यात आलेल्या प्रवासी बोट सुविधामुळे गावामधील संपर्क जोडण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकरी, पर्यटक, कामगार, विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवासाचा लाभ मिळणार आहे, त्यामुळे ही सेवा केवळ संपर्क सुविधा नसून ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे, तालुक्यातील पश्चिम भागातील आपत्कालीन परिस्थिती संपर्क साधण्यास मदत होणार आहे, असेही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या सुचनांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत गायरान जमिनीबाबत बैठक घेऊन सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी इंडियाने केलेल्या सहकार्याबाबत आभार व्यक्त करत यापुढेही राज्य शासनास अशाच प्रकारे सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

## परीक्षा पारदर्शक होण्याच्या पार्श्वभूमीवर शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्याचा निर्णय

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १,०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्यात आली असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे, परीक्षा प्रक्रीया पारदर्शकतेत होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत टीईटी परीक्षा सुरक्षित व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. तथापि, दि. २७ जून २०२६ रोजी पहाटे मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार भिवंडी येथे काही व्यक्तींना टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत माहिती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्यानुसार भिवंडी पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकून तपासणी केली. या प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावून पडताळणी करण्यात आली. तपासादरम्यान संबंधित व्यक्तींकडे आढळलेल्या काही प्रश्न आणि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) जून २०२६ च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न समान असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने दि. २८ जून २०२६ रोजी नियोजित टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात आला आहे. टीईटी परीक्षेच्या नव्या तारखेसह इतर अद्ययावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे परिषदेकडून कळविण्यात आले आहे.

## 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण' मोहिमेत सर्व पालकांनी सहभागी व्हावे

■ रविवार २८ जून रोजी ० ते ५ वयोगटातील बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजा; आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील 0 ते 5 वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त महाराष्ट्राचा दर्जा कायम राखण्यासाठी सर्व पालकांनी रविवार, 28 जून 2026 रोजी आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

या मोहिमेसाठी राज्यभरात 89,489 लसीकरण बुथ, 26,530 ट्रान्झिट पथके, 13,518 मोबाईल पथके आणि 586 रात्रपाळी पथके कार्यरत राहणार आहेत.

देशाला पोलिओमुक्त ठेवण्यासाठी सन 1995 पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात पोलिओचा शेवटचा रुग्ण सप्टेंबर 2010 मध्ये बीड




जिल्ह्यात आढळला होता, तर देशातील शेवटचा रुग्ण जानेवारी 2011 मध्ये पश्चिम बंगालमध्ये नोंदविण्यात आला होता. त्यानंतर 27 मार्च 2014 रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारताला पोलिओमुक्त देश म्हणून घोषित केले. मात्र, शेजारील काही देशांमध्ये अद्यापही पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने देशात या आजाराचा प्रसार होण्याचा धोका कायम असून सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात रविवार, 28 जून 2026 रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत राज्यातील 0 ते 5 वर्षे वयोगटातील अंदाजे 1 कोटी 3 लाख बालकांना सकाळी 8 ते सायंकाळी 5 या वेळेत पोलिओ प्रतिबंधक बायव्हॅलेंट ओरल पोलिओ व्हॅक्सीन (bOPV) चे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. बुथवर येऊ न शकलेल्या बालकांचे शहरी भागात पुढील पाच दिवस आणि ग्रामीण भागात पुढील तीन दिवस आरोग्य कर्मचाऱ्यांकडून गृहभेटीद्वारे लसीकरण करण्यात येईल. तसेच प्रवासात असलेल्या बालकांसाठी ट्रान्झिट, मोबाईल आणि रात्रपाळीच्या विशेष पथकांमार्फतही मोहिमेच्या कालावधीत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य लसीकरण कृती दलाची बैठक घेण्यात आली असून सर्व संबंधित शासकीय विभाग आणि विविध यंत्रणांना सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. मोहिमेच्या समन्वयासाठी प्रत्येक जिल्हा आणि महानगरपालिकेसाठी राज्यस्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून जिल्हा, तालुका आणि वॉर्ड स्तरावरही नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## श्रीक्षेत्र आळंदीच्या विकासासाठी शासन सकारात्मक

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार : उपमुख्यमंत्र्यांकडून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन; संस्थान कमिटी विश्वस्तांसोबत बैठक**

■ पुणे (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज श्रीक्षेत्र आळंदी येथे भेट देऊन संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी माउलींच्या चरणी राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीचे आणि सर्वांगीण विकासाचे साकडे घातले.

दर्शनानंतर उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या विश्वस्तांसोबत बैठक घेऊन संस्थानच्या विविध कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी विश्वस्तांनी श्रीक्षेत्र आळंदीच्या विकासासंदर्भातील विविध प्रस्ताव, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत विकासकामे तसेच संस्थानसमोरील विविध प्रलंबित प्रश्न मांडले. या संदर्भातील सविस्तर निवेदनही संस्थानच्या वतीने त्यांना सादर करण्यात आले. निवेदनातील मागण्या आणि विविध



विषयांवर शासन स्तरावर सकारात्मक विचार करण्यात येईल. संबंधित विभागांशी समन्वय साधून योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. श्रीक्षेत्र आळंदी हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर दर्शन बारी चा विषय मागील १२ वर्षांपासून प्रलंबित आहे तो लवकर मार्गी लावण्याबाबत ग्वाही दिली.

याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार दिलीप वळसे पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते, आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रशांत कुर्हाडे तसेच आजी-माजी पदाधिकारी, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त श्री योगी निरंजननाथ, चैतन्य कबीर लोंढे, पुरुषोत्तम पाटील, ॲड. रोहिणी पवार, वारकरी संप्रदायातील मान्यवर तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## 'एमपीएससी'च्या सर्व पूर्व परीक्षा सीबीटी पद्धतीने; २१ दिवसांत निकाल

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सर्व आगामी पूर्व परीक्षा संगणकाधारित कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली. परीक्षांतील विलंब कमी करून भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी आयोगाने व्यापक सुधारणा सुरू केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयामध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अध्यक्ष भीमनवार बोलत होते. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर व परीक्षा नियंत्रक सरिता बांदेकर – देशमुख उपस्थित होते. अध्यक्ष भीमनवार म्हणाले की, यापूर्वी परीक्षांचे निकाल आणि पुढील टप्प्यांमध्ये मोठा विलंब होत असल्याने उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी आयोगाने पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांत जाहीर करण्याचे नियोजन केले आहे. नुकताच जाहीर



झालेला राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल अवघ्या २२ दिवसांत प्रसिद्ध करण्यात आला असून, यापुढे सर्व पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. याशिवाय, ज्या वर्षी परीक्षा होईल, त्याच वर्षात तिची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य आयोगाने निश्चित केले आहे. मुलाखत असलेल्या पदांची निवड प्रक्रिया ९ ते ११ महिन्यांत, तर केवळ लेखी परीक्षा असलेल्या पदांची प्रक्रिया ६ ते ७ महिन्यांत पूर्ण केली जाईल. यामुळे उमेदवारांना निश्चितता मिळून त्यांच्या करिअरवरील अनिश्चितता कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पुणे विभागातील कर्करोग रुग्णालयाच्या कामाला तातडीने गती देण्यात येईल

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार**

■ पुणे (दै. संध्या)

कर्करोगाची दिवसेंदिवस वाढती रूग्णसंख्या विचारात घेता या रोगाचे अचूक निदान आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्यास प्राण वाचण्यास मदत होते. रुग्णांना जवळच्या रुग्णालयात माफक, अचूक निदान तसेच अत्याधुनिक उपचार उपलब्ध होईल याद्दष्टीने राज्य शासन प्रयत्नशील आहे, पुणे विभागातील कर्करोग रुग्णालयाच्या कामाला तातडीने गती देण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

आळंदी येथील इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे पेटसिटी युनिटच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार दिलीप वळसे-पाटील, बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, मुख्य



कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन देवमाने, आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्यूटचे विश्वस्त डॉ. संजय देशमुख, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, देशात कर्करोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत असून त्याच्याविरुद्ध लढण्यासाठी अचूक निदान आणि योग्यप्रकारे उपचार महत्त्वाचे आहे. उपचार उशिरा सुरु झाल्यास रुग्णांचा वेळ आणि खर्चात वाढ होते; याच बाबीचा विचार करुन केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनेमध्ये कर्करोगावरील उपचाराचा समावेश केलेला आहे.

राज्यशासन कर्करोगाविरुद्ध लढ्यासाठी केवळ उपचारावर भर न देता प्रतिबंध आणि अचूक निदानावर विशेष लक्ष देत आहे. त्याचाच भाग म्हणून राज्यस्तरीय कर्करोग उपचार व्यवस्था सुरु करण्यात आली आहे. महाकेअर फाऊंडेशनच्या माध्यमातून कर्करोग उपचार व्यवस्था उभारण्यात येणार आहे. तसेच नागपूर येथे हायएनर्जी मेडिकल सायक्लोस्टोन प्रकल्प स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, त्यामुळे कर्करोग उपचार, निदान आणि संशोधनाला चालना मिळणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रुग्णालयाला भेट दिली असता रुग्णालय व्यवस्थापनाने अत्याधुनिक पेटसिटी मशीनकरिता निधीची मागणी केली असता, कर्करोगाचे गांभीर्य आणि रुग्णांची गैरसोय विचारात घेता त्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून या मशीनकरिता २७ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. या पेटस्कॅन मशीनच्या माध्यमातून कर्करोगाचे अचूक निदान होण्यासह डॉक्टरांना आधुनिक उपचारपद्धतीचा अवलंब करता येणार आहे. सर्वसामान्य गरजू रुग्णांना या अत्याधुनिक आरोग्य सुविधांचा लाभ होणार असून त्यांचे प्राण वाचणार आहेत. इंद्रायणी रुग्णालयाने व्यवसायिक दृष्टिकोन न ठेवता नेहमीच रुग्णांना माफक दरात आरोग्यसेवेला प्राधान्य दिले आहे. हे कार्य सामजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे, यापुढेही अशीच निरंतर रुग्णसेवा होत राहील, या कार्याला राज्य शासनाकडून सहकार्य करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या.

श्री. वळसे पाटील म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नामुळे पेटस्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या कर्करोग रुग्णालयात आर्थिकदृष्टया दुर्बल, सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळत आहे, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी राहण्याची व्यवस्थेची सुविधा आवश्यक आहे, राज्य शासनासोबत सेवाभावी संस्थानी मिळून हे काम करावे, आज दिवसेदिवस कर्करोगाचे प्रमाणात वाढ होत असून कर्करोगा विरुद्ध लढण्याची आपली सामजिक जबाबदारी आहे. येत्या काळात जिल्ह्यात कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी सुसज्ज कर्करोग रुग्णालयांची उभारणी होणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचीही गरज आहे, असे वळसे पाटील म्हणाले. श्री. काळे म्हणाले, सामजिक बांधिलकी जपत आळंदी येथील इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून आळंदी, खेड परिसरासह विविध भागातील रुग्णांना कर्करोगावर उपचार होत आहे, यापूढेही रुग्णसेवेच्या माध्यमातून कर्करोगमुक्त परिसर होण्यास मदत होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सासवड शहर पत्रकारांनी निवेदन देत खासदार संजय दिना पाटील यांचा केला निषेध

सासवड (दैनिक संध्या) : मुंबई येथील खासदार संजय दिना पाटील यांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातील पत्रकारांना धमकी तसेच शिवीगाळ केली याचा संपूर्ण राज्यात निषेध होत आहे. सासवड येथील शहर पत्रकार संघटनेने देखील पाटील यांच्या लोकशाही मूल्यांवर आघात करण्याच्या या कृतीचा तीव्र निषेध केला असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन सासवड पोलिसांना दिले आहे. सासवडचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांना सदरचे निवेदन देण्यात आले. गुप्त वार्ता विभागाचे रुपेश भगत या वेळी उपस्थित होते.पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले, कार्याध्यक्ष जीवन कड, सचिव गणेश मुळीक खजिनदार संभाजी महामुनी, जेष्ठ पत्रकार बाळासाहेब कुलकर्णी, सुधीर गुरव त्याच प्रमाणे सदस्य जगदीश शिंदे, अर्सलान बागवान यावेळी हजर होते.

### आंचल अजित वडगावकर सीए इंटरमिजिएट ग्रुप टू परीक्षेत यशस्वी

आळंदी (दैनिक संध्या) : प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आळंदीतील आंचल अजित वडगावकर हिने देशातील कठीण मानल्या जाणाऱ्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) इंटरमिजिएट ग्रुप टू परीक्षेत यश संपादन करून कुटुंबासह आळंदीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. आंचलचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आळंदी येथे झाले. कौटुंबिक जबाबदाऱ्या, अभ्यासासाठी मर्यादित वातावरण आणि अनेक अडचणी असूनही तिने सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर हे यश मिळविले. शालेय जीवनापासूनच अभ्यासू व ध्येयवेडी असलेल्या आंचलने प्रत्येक टप्प्यावर चिकाटी कायम ठेवत हे यश संपादन केले. आंचलच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या यशामुळे वडगावकर परिवार, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था आणि संपूर्ण आळंदी परिसराचा गौरव वाढला आहे.

### पेपरफुटीप्रकरण दोषींच्या तोंडाला काळे फासू



भिवंडी (दैनिक संध्या) : शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटीप्रकरणातील दोषींना थेट भर चौकात फासावर लटकवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाकडून करण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपींनी शिक्षक TET परीक्षेचाच नाही तर हजारो शिक्षकांच्या भवितव्याशी खेळ केल्याचा आरोप करत त्यांना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, तसेच या प्रकरणातील दोषींच्या तोंडाला काळे फासू असा इशारा मुंबईतील प्रख्यात शिक्षक नेते आणि मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे प्रमुख डॉ. विशाल कडणे यांनी दिला. शिक्षण व्यवस्था आणि शिक्षकांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या TET पेपरफुटीप्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी पोलीस आयुक्तांकडे करणार असल्याचे मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे प्रमुख डॉ. विशाल कडणे यांनी सांगितले. अशा गंभीर गुन्ह्यांविरोधात आता शांत राहून चालणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. याचबरोबर, या गैरप्रकारातील दोषींविरोधात तीव्र निषेध नोंदवण्यासाठी त्यांच्या तोंडाला काळे फासण्याचे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही डॉ. कडणे यांनी दिला. स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील भ्रष्टाचारामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होत असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पेपर होण्या आधीच पोलिसांनी पेपर फुटीचे प्रकरणातील दोषींना अटक केल्याने शिक्षक नेत्यांनी पोलिसांचे कौतुक केले. पुढे पेपरफुटीप्रकरणातील सर्व संबंधितांची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी मागणीही मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाने केली आहे.

### माऊलींच्या अश्वांचे आळंदीकडे प्रस्थान

आळंदी (दैनिक संध्या) : तुतारीचा गगनभेदी आवाज... टाळ-मृदंगाचा निनाद... अन् माऊली नामाचा अखंड जयघोष करीत आज संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त माऊलींच्या मानाच्या अश्वांचे अंकली येथून भक्तिमय वातावरणात आळंदीकडे प्रस्थान झाले. यावेळी उपस्थित भाविकांनी पुष्पांचा वर्षाव करून मानाच्या अश्वांना आषाढी वारीतील वाटचालीसाठी निरोप दिला. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्यानिमित्ताने श्री माऊलींच्या अश्वांचे सरदार शितोळे वाडा (अंकली, बेळगाव) येथे उर्जित सिंह शितोळे सरकार आणि महादजी राजे शितोळे सरकार यांनी परंपरेनुसार विधिवत मानाचा ध्वज आणि मानाच्या अश्वांचे पूजन केले.

# कृषीपंपाच्या केबल चोरणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

## जुन्नर आंबेगाव तालुक्यातील १५० शेतकऱ्यांच्या केबल चोरीचे १२ गुन्हे उघड

नारायणगाव (दै. संध्या)





पुणे ग्रामीण जिल्हयातील जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाच्या केबल चोरीचे प्रमाण वाढले होते. कृषीपंपाची केबल चोरी गेल्याने परीसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असे, ऐन उन्हाळयाच्या दिवसामध्ये केबल चोरी होत असल्यामुळे शेतकरी वर्ग हैराण झाला होता, त्यामुळे नागरीकांकडून नाराजी व्यक्त केली जात होती. केबल चोरी हे दुर्गम भागात असल्याने चोरी झालेनंतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, सीसीटीव्ही याद्वारे तपास होणे अडचणीचे होते. मा. पोलीस अधीक्षक सो. पुणे ग्रामीण यांनी स्था.गु.शा. चे पथकाची बैठक घेवून सन २०२६ मधील दाखल गुन्हयांचा आढावा घेवून गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मागदर्शन करून सुचना केल्या. त्या अनुषंगाने तपास पथकांनी तपास सुरू केला. तपास पथकाकडून गुन्हे घडलेली ठिकाणे, गुन्हयांची वेळ, गुन्हयांची कार्यपद्धती याचा आढावा घेण्यात आला.

तपास पथकाने गुन्हयांची घटनास्थळे पडताळले असता सदर केबल चोरीचे गुन्हे हे एकच टोळी करत असल्याचे तपास पथकाचे लक्षात आले. स्थानिक गुन्हे शाखेची तपास पथकांनी रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासून त्यांच्या सध्याच्या हालचालींवर लक्ष केंद्रीत करून तपास चालू केला. गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली. की, सदरचे गुन्हे हे मध्यप्रदेश राज्यातील आरोपी यांनी केले असुन आरोपी चोरी करण्याच्या ठिकाणच्या आसपास येऊन राहतात व रात्रीच्या वेळी चोरी करतात व सध्या आरोपी हे नाशिक जिल्हयातील घोटी गावच्या हद्दीत वास्तव्यास आहेत.

त्यानुसार नाशिक येथील घोटी गावी जावून आरोपी नामे १) सुरज उर्फ लौन्डीलाल रामसर आदिवासी वय ४० वर्षे सध्या रा. कुंदेवाडी ता. सिन्नर जि. नाशिक मुळ रा. बुढा देवगाव ता. रेठी जि. कठनी राज्य. मध्यप्रदेश २) कपसलाल सर्कस पवार वय ५० वर्षे सध्या रा. मानिकखांब ता. इगतपुरी जि. नाशिक मुळ रा. कुडे पो. हरदुआ ता.जि. कठनी राज्य. मध्यप्रदेश ३) आराजा छत्तेसिंग पवार वय १९ वर्षे रा. मानिकखांब ता. इगतपुरी जि. नाशिक मुळ रा. कुडे पो. हरदुआ ता.जि. कठनी राज्य. मध्यप्रदेश ४) अतुल शापीलाल चौहान वय २१ वर्षे सध्या रा. रा.मानिकखांब ता. इगतपुरी जि. नाशिक मुळ. बेडीयॉव पो.छनेरा ता. नया हरसुद जि. खांडवा राज्य. मध्यप्रदेश ५) गगन शापीलाल चौहान वय २० वर्षे सध्या रा. मानिकखांब ता. इगतपुरी जि. नाशिक मुळ. बेडीयॉव पो.छनेरा ता. नया हरसुद जि. खांडवा राज्य. मध्यप्रदेश यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी पुणे जिल्हयातील जुन्नर आंबेगाव तालुक्यातील केबल चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. तपासा दरम्यान आरोपी कडून १५० शेतकऱ्यांच्या केबल वायर जप्त करण्यात आल्या असून एकूण रू. ८,१२,०००/- रू. कि.चा मुद्देमाल हस्तगत करणेत आलेला आहे.

चौकशीमध्ये त्यांचेकडून खालील १२ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. १) नारायणगाव- ७९/ २०२६ भा.न्या.सं.क.३०३ (२), २) नारायणगाव- १०७/ २०२६ भा.न्या. सं.क.३०३ (२), ३) नारायणगाव- १४५/ २०२६ भा.न्या.सं.क. ३०३ (२), ४) नारायणगाव- १४६/ २०२६ भा.न्या.सं.क.३०३ (२), ५) नारायणगाव - १४७/ २०२६ भा.न्या. सं.क. ३०३ (२), ६) नारायणगाव- १४८/ २०२६ भा.न्या.सं.क.३०३ (२), ७) नारायणगाव - १४९/ २०२६ भा.न्या.सं.क. ३०३ (२), ८) नारायणगाव - १५०/ २०२६ भा.न्या. सं.क. ३०३ (२), ९) ओतूर - १४२/ २०२६ भा.न्या.सं.क.३०३ (२), १०) ओतूर - १७३/२०२६ भा.न्या. सं.क.३०३ (२), ११) जुन्नर - १४०/२०२६ भा.न्या.सं.क.३०३ (२), १२) पारगाव - ६४/२०२६ भा.न्या.सं.क.३०३ (२) असे एकूण १२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

## ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन अर्थात हिंदू साम्राज्य दिन साजरा

पुणे (दै. संध्या)



तिथीने शुद्ध त्रयोदशी म्हणजेच २७ जून रोजी विविध ठिकाणी संपन्न होणारा शिवराज्याभिषेक दिन म्हणजेच हिंदू साम्राज्य दिन हा केवळ उत्सव नसून तो या भूमीचा राजकीय व सामाजिक अस्मितेचा हुंकार आहे".इंग्रजी तारखेचा परका चष्मा नाकारून सूर्य - चंद्राच्या गतीवर आधारित 'चांद्र - सौर' कालगणनेनुसार साजरा होणारा मूळ उत्सव." असे उद्गार विंग कमांडर अविनाश मुथाळ ( निवृत्त ) यांनी काढले.ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखेच्या वतीने आयोजित शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात बोलत होते. राष्ट्रीय चेतना म्हणजेच विखुरलेल्या समाजाला एका सूत्रात बांधून हिंदवी स्वराज्याच्या सुशासनाचे मापदंड अधोरेखित करणारा सुवर्णकाळ असल्याचेही ते पुढे म्हणाले."छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील असे महान आणि यशस्वी सम्राट आहेत की ज्यांची स्मृती केवळ वर्तमानातच नव्हे तर येणाऱ्या असंख्य पिढ्यांपर्यंत टिकून राहील व त्यांचे कार्य हे भारतीय अस्मिता,स्वाभिमान आणि राष्ट्र उभारणीची एक अमरगाथा म्हणून सदैव स्मरणात राहील" कर्वेनगर हाऊसिंग सोसायटीच्या उद्यानासमोर हा सोहळा आयोजित केला होता. यामध्ये सोसायटीचे नागरिक,स्वयंसेवक,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली.उपस्थित नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाच्या सुरवातीस कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखेचे सह मुख्यशिक्षक प्रकाश देशपांडे यांनी प्रमुख पाहुणे माननीय संघचालक (संभाजीभाग) अनिल व्यास यांचा व वक्ते विंग कमांडर अविनाश मुथाळ (निवृत्त) यांचा उपस्थितांना परिचय करून दिला.योग शिक्षक सुभाष फडके यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचेवर "हा धन्य धन्य शिवराय" गीत सादर केले.

## ससाणेनगर परिसरात दूषित पाणीपुरवठा

पुणे (दै. संध्या)

अगोदरच दिवसाआड आणि अपुरा पाणीपुरवठा होत असताना ससाणे नगर परिसरात काही ठिकाणी दूषित पाणीपुरवठा होत असल्याने येथील नागरिकांनी पाणीपुरवठा विभागाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आज पाणीच भरू न शकल्याने व उद्याही पाणी मिळणार नसल्याने पुढील दोन दिवस पाणी कसे मिळवायचे, असा प्रश्न येथील नागरिकांनी केला आहे. महापालिकेने पाणीपुरवठा बाबत केलेल्या नियोजनानुसार या भागातही दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. आज मात्र हा संपूर्ण पाणीपुरवठा सांडपाणी मिश्रित होता. विशेषतः येथील गल्ली नंबर तीन मध्ये हा दूषित पाणीपुरवठा झाला. तांबूस व काळपट स्वरूपाचा हा पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांनी ते पिण्यासाठी भरणे टाळले. चार-पाच महिन्यांपूर्वीही या ठिकाणी अशा स्वरूपाचा पाणीपुरवठा होत होता. तो दुरुस्त करण्यात आल्यानंतर आज पुन्हा त्याच प्रकारे पुन्हा पुरवठा होवू लागल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

## आठवडे बाजारात शिरूर पोलिसांची धडक कारवाई

शिरूर (दै. संध्या)

**नागरिकांशी संवाद साधत सुरक्षेचा घेतला आढावा**

शिरूर पोलीस स्टेशन हद्दीतील शिरूर शहरातील मार्केट यार्ड येथे भरलेल्या आठवडे बाजाराला शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी आपल्या पोलीस पथकासह भेट देत सुरक्षा व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था तसेच नागरिकांच्या अडचणींचा आढावा घेतला. दर शनिवारी भरत असलेल्या या आठवडे बाजारात शिरूर शहरासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील शेतकरी आणि ग्राहक वर्गही भाजीपाला, किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदी-विक्रीसाठी येथे मोठ्या प्रमाणात येत असल्याने परिसरात मोठी गर्दी होत असते. या गर्दीचा गैरफायदा घेत मोबाईल चोरी, दागिने चोरी तसेच इतर मालमत्तेविरुद्धचे गुन्हे घडू नयेत यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत बाजार परिसरात व्यापक पेट्रोलिंग करण्यात आले. यावेळी पोलिसांनी बाजारात उपस्थित शेतकरी, व्यापारी व नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व सूचना जाणून घेतल्या. प्राप्त झालेल्या सूचना आणि समस्या यावर आवश्यक उपाययोजना करण्यासाठी मार्केट यार्ड प्रशासनास लेखी पत्राद्वारे कळविण्याची तयारी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड परिसरात विशेष नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान ब्लॅक फिल्म लावलेली वाहने, नंबर प्लेट नसलेली वाहने, वाहन चालविण्याचा परवाना नसलेले चालक तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली.

## नाझरे धरणात शून्य टक्के उपयुक्त पाणी साठा

जेजुरी (दै. संध्या)



**पाऊस न पडल्यास पाणी टंचाईचे संकट**

पुरंदर तालुक्याला वरदान ठरलेल्या नाझरे (मल्हार सागर) धरणात उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्के असून मृतसाठ्यातील पाणी पिण्यासाठी वापरले जात आहे. जून महिना संपत आला असूनही पाऊसअभावी पाणी टंचाईचे संकट उभे राहिले आहे.

७८८ दशलक्ष घनफूट पाणी साठा क्षमता असलेल्या नाझरे जलाशयावर तीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आहेत. जेजुरी शहर,जेजुरी एमआयडीसी. पारगाव माळशिरस योजना,नाझरे पांडेश्वर ,मावडी व इतर गावे या योजनांतर्गत जवळपास ५६ गावे व वाडीवस्त्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो . तर एक हजार हेक्टर शेत जमीन हंगामी स्वरूपात ओलिता खाली येते.

आज दि. 27 रोजी नाझरे धरणात मृत साठ्याखाली पाणी साठा असून यात गाळाचे प्रमाण अधिक आहे. पुरंदर तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान 496 मिली मीटर असून गेल्या वर्षी मे व जून महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस होवून 25 जून रोजी धरण पूर्ण क्षमतेने भरले होते.या वर्षी पुरंदर मध्ये मान्सून पूर्व पाऊस झाला नाही. तर जून 26 अखेर केवळ 59 मी मी पाऊसाची नोंद झाली आहे. नाझरे धरणातील पाणीसाठा मृत साठ्याच्या खाली गेले असून 31 ऑगस्ट पर्यंत यातील पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणार आहे.

गेली अनेक वर्षे जेजुरी शहराला चार दिवसातून एकदा पाणी दिले जाते. सध्या मांडकी डोहावरील योजनेच्या दुरुस्तीचे काम,तसेच नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असून हे काम लवकरच पूर्ण होऊन या योजनेतून जेजुरी शहराला पाणी मिळणार असून जेजुरीचा पाणी प्रश्न तात्पुरता मिटणार आहे . मात्र नाझरे धरणावर अवलंबून असणाऱ्या अनेक गावे व वाड्या वस्त्यांवर पाणी टंचाईचे भीषण संकट निर्माण होणार आहे.

वीर धरणावरून जेजुरी शहराला पिण्याचे पाणी देण्यासाठी नवीन पाणी योजनेचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले असून एक वर्षात ही योजना पूर्ण होणार आहे. ही योजना कार्यान्वयीत झाल्या नंतर जेजुरी शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार आहे.

# “ऑपरेशन उबाठा बुडवा”चे सूत्रधार स्वत: संजय राऊतच

## संजय राऊत यांच्या बेताल वक्तव्यांवर खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांचा घणाघात

पुणे (दै. संध्या)



शिवसेना पक्षाच्या प्रवक्त्या व खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी आज पुण्यातील सारसबागेसमोरील शिवसेना भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या सातत्याने सुरू असलेल्या बेताल, अश्लाघ्य आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या वक्तव्यांचा खरपूस समाचार घेतला. यावेळी शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे प्रमुख उपस्थित होते. संजय राऊत यांच्या वक्तृत्वामुळेच उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची वैचारिक दिवाळखोरी संपूर्ण महाराष्ट्रासमोर उघडी पडली असून, पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांना दूर लोटण्यामागे सर्वात मोठे कारण त्यांच्या विषारी आणि अहंकारी भाषेचे राजकारण असल्याचा घणाघात खासदार वाघमारे यांनी केला.

खासदार डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या की, ठाकरे गटातील नेते आणि कार्यकर्ते कथित "खोक्यांमुळे" पक्ष सोडून गेले नसून, पक्षातील असुरक्षित वातावरण, नेतृत्वाचा अभाव आणि संजय राऊत यांच्यासारख्या व्यक्तींच्या सततच्या अपमानास्पद वक्तव्यांमुळे निर्माण झालेल्या "धोक्यामुळे" त्यांनी पक्षाला रामराम ठोकला. आज महाराष्ट्रात सुरू असलेले "ऑपरेशन उबाठा बुडवा" हे विरोधकांनी नव्हे, तर स्वतः संजय राऊत यांनीच त्यांच्या बेताल वक्तव्यांद्वारे सुरू केले असून, प्रत्येक पत्रकार परिषदेत ते उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची प्रतिमा अधिकाधिक खालावत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

त्या पुढे म्हणाल्या की, संजय राऊत आता ठाकरे गटाचे प्रवक्ते राहिलेले नसून, काँग्रेसची राजकीय सुपारी घेऊन शिवसेना आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सातत्याने टीका करणारे "सुपारीबाज प्रवक्ते" बनले आहेत. महाराष्ट्राच्या विकासाची चर्चा करण्याऐवजी वैयक्तिक टीका, महिलांबद्दल अवमानकारक भाषा आणि विरोधकांबद्दल अपशब्द वापरणे हीच त्यांची राजकीय ओळख बनली आहे. अशा भाषेमुळे समाजात चुकीचा संदेश जात असून, लोकशाहीतील राजकीय संस्कृतीच कलंकित होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सुरू असलेल्या विकासकामांमुळे विरोधक पूर्णपणे अस्वस्थ झाले आहेत. राज्यभर विकासाचे नवे विक्रम घडत असताना त्याला उत्तर देता येत नसल्यामुळेच संजय राऊत यांच्याकडून अशा प्रकारची निराधार आणि बेताल विधाने केली जात आहेत. उद्धव ठाकरे यांच्या सुरू असलेल्या दौऱ्यांवर टीका करताना वाघमारे म्हणाल्या की, जनतेने नाकारलेल्या नेतृत्वाकडून जनतेला मार्गदर्शन मिळू शकत नाही. स्वतःच्या पक्षातून निघून गेलेल्या खासदारांच्या मतदारसंघात जाऊन भाषणे करणे हा केवळ राजकीय दिखावा असून, त्यातून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

महिलांविषयी अत्यंत आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरणाऱ्या संजय राऊत यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करत, महिलांच्या सन्मानाच्या रक्षणासाठीच ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आल्याचे खासदार वाघमारे यांनी स्पष्ट केले. महिलांचा अवमान करणाऱ्या वक्तव्याप्रकरणी त्यांच्या विरोधात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती देत त्यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना थेट प्रश्न केला की, संजय राऊत यांच्या महिलांचा अवमान करणाऱ्या वक्तव्याला त्यांचा पाठिंबा आहे का? महाराष्ट्रातील महिला भगिनी या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे मागत असल्याचेही त्यांनी सांगितले.

